ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

एप्रिल २०१०   मूल्य १० रुपये



जागतिक पुस्तकदिनानिमित्त विशेष लेख



## चंद माणिके संमेलनातील!



RNI NO - 428 / 1987
RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001




## ग्रंथाली पुस्तकांचा नवा संच

२५१
पुस्तके
१५०००
रुपयांत!
मूळ किंमत
३४७०० रुपये

### संचिताची कोजागिरी

यशवंत पाठक




मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.

नुकतीच प्रसिद्ध झालेली
दोन पुस्तके!

### सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

यशवंत व्हटकर




मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**एप्रिल २०१०**
**वर्ष ३० वे, अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **दिलीप चावरे**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.,

पुण्यातले साहित्य संमेलन पार पडले. आता तयारी सुरू आहे महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याची. गेल्या वर्षात महाराष्ट्र कोठे पोचला आणि मराठी भाषेने कोणते झेंडे लावले याचा विचार गंभीरपणे झाला तरच या सण-समारंभांना काही अर्थ प्राप्त होईल. असा विचार आणि त्या अनुषंगाने कृती करण्याबाबत अर्थातच महाराष्ट्र शासनाचा पुढाकार असावा ही अपेक्षा रास्तच म्हणावी लागेल. त्यामागोमाग प्रमुख राजकीय पक्षांनीही याबाबत आपण सक्रिय असल्याचे दाखवून देणे महत्त्वाचे ठरेल. तथापि सारीच जबाबदारी शासनावर आणि राज्यकर्त्यांवर टाकून आपण नामानिराळे राहणे साहित्यक्षेत्राला खचितच शोभणार नाही. उठता-बसता राजकारण्यांना थपडा देणारे साहित्यिक स्वतःच्या ऐपतीवर एवढे यशस्वी संमेलन आयोजित करण्याची सुतराम शक्यता नाही. ही वस्तुस्थिती कटु असली तरी अपरिहार्य आहे. म्हणूनच आपल्या कुवतीनुसार आपल्याला झेपतील असेच काही उपक्रम साहित्य जगताने या वर्षात हाती घ्यावे. त्यापैकी एक असावा दर्जेदार वाङ्मय वाचकांसमोर आणण्याचा. आजकाल रस्त्यांवर होर्डिंगज्ची भाऊगर्दी झाली आहे कारण ज्याच्याकडे पैसा आहे तो होर्डिंग चढवतो आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रातही असे तत्त्व घुसखोरी करताना दिसत आहे. त्यामुळे एकीकडे नवख्या लेखकांचा सुळसुळाट वाढत आहे तर दुसरीकडे वाचण्यासारखे काही हाती लागण्याचे प्रमाण व्यस्त होऊ लागले आहे. या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास मराठी वाहिन्यांसारखी मराठी भाषाव्यवहाराची अनास्था होण्यास फार वेळ लागणार नाही. किंबहुना ती सुरू झालीही आहे असे म्हणणेही अतिशयोक्त ठरणार नाही. विवाहबाह्य प्रकरणे, ग्रामीण-शहरी संघर्ष, पुनर्जन्म, दैवी चमत्कार, असूया, कट-कारस्थाने आणि मानसिक विकृतीने पछाडलेल्या पात्रांची भरमार आलेल्या जणू एका साच्यातून पडणाऱ्या मराठी मालिका म्हणजे महाराष्ट्राच्या बुद्धीवैभवाचा उघड उपमर्द आहे. परंतु फुटकळ 'वाचकपत्रे' सोडल्यास त्याबाबत कोणीही आवाज उठवताना आढळत नाही. एके काळी विश्राम बेडेकर, ना.ह. आपटे, शांताराम आठवले, वि.स. खांडेकर अथवा अनंत काणेकर असे दिग्गज चित्रपट सृष्टीबरोबर संबंधित असत. त्यामुळे एकापेक्षा एक सरस कलाकृतींची निर्मिती होत असे. हल्ली मालिका 'पाडून' देणारे हुकमी लेखक उपलब्ध असल्यावर इतर विचार कशाला कोण करील?

हे अरण्यरुदन ठरू नये यासाठी विशेषतः तरुणांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. 'पुराणमित्येव न साधु सर्वम्' हे खरे असले तरी एकेकाळी भाषक अलंकारांनी सजलेली आपली मायमराठी भडक साजशृंगार केलेली बारबाला बनणे कोणालाच आवडणार नाही हे सुद्धा तेवढेच सत्य आहे. मराठीवरील आक्रमणे वाढत चालली आहेत. अशावेळी मराठीचा गाभा टिकवून ठेवण्यासाठी तमाम साहित्यपूजकांनी आळस झटकून कार्यरत होण्याची गरज आहे. जनमत एखाद्या प्रश्नावर तयार होत असल्याचे दिसले की आपोआप त्याबाबतच्या कृतीला गती मिळत जाते. मराठीसाठी हे घडवून आणणे अशक्य नाही. महाराष्ट्राची शतकपूर्ती साजरी होताना या मातीवर मराठी जिवंत रहावी असे वाटत असल्यास पुढची वर्षे डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी लगेचच कामाला लागावे, हाच महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवाचा संदेश आहे.

**– संपादक**

# लिहिणाऱ्यांचे हात हजारो.....

## श्रीकांत बोजेवार

**२३ एप्रिल हा जागतिक ग्रंथदिवस त्यानिमित्त या अंकात लेखक, पत्रकार, संपादक यांचे पुस्तकांबाबतचे 'ग्रंथाच्या सहवासात' हे लहानपणापासून आलेले अनुभव प्रसिद्ध करत आहोत.**

**आज वाचन संस्कार होण्यासाठी विविध उपक्रम होत आहेत. वाचकमंडळे, पुस्तकभिशी योजना, शालेय विद्यार्थ्यांत वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी स्वयंसेवी व्यक्ती, संस्था यांचे साहाय्य होत आहे. तरी वाचक कमी होत असल्याचे जाणवते. या पार्श्वभूमीवर हे लेख वाचनाचे महत्त्वच नाही तर त्याची आस विशद करतील.**

**पुस्तक ही काही पवित्र गोष्ट नाही, आता पुस्तकांची सामाजिक गरज संपलेली आहे, पुस्तक लोक विकत घेतात पण वाचतात की नाही याबद्दल शंका वाटते; असे काही जणांना वाटते परंतु दोन ग्रंथप्रेमी एकत्र आले की वय, शिक्षण, जात, सामाजिक दर्जा हे सर्व विसरून आवडलेल्या पुस्तकासंबंधी वा एखाद्या लेखकाबद्दल बोलू लागतात. मैत्रीचे धागे घट्ट करण्यासाठी वाचनाचा छंद उपयोगी ठरतो.**

**''काही पुस्तके चव घेण्यासाठी असतात, बाकीची गिळण्यासाठी आणि काही थोडी चावून चावून खाण्यासाठी व पचवण्यासाठी.'' उत्तम पुस्तके कळत-नकळत आपल्या मनावर खोलवर संस्कार करतात. त्यांच्या वाचनाने आपली अभिरुची संपन्न होत असते. वृत्तपत्रांच्या पुरवण्या व साप्ताहिकातील विशेष वृत्तांत या पलिकडे जाऊन आपणास अधिक ज्ञानप्राप्ती करावयाची असेल तर पुस्तकांशिवाय पर्याय नाही.**

वाचनाची सवय आणि संस्कृती जर घरात असेल तर ती आपल्यापर्यंत चटकन झिरपते. माझी आई आणि बाबा दोघांनाही वाचण्याची आवड होती. आज त्याचा विचार करताना लक्षात येतं की त्यांच्या छंदाचे माझ्यावर खूप उपकार आहेत. छंद अशासाठी म्हणतो आहे की ज्या अर्थानं वाचक घडणं, त्याचं वाचन प्रगल्भ होणं अभिप्रेत असते तसे काही त्यांच्याबाबत फार झालेलं नव्हतं. परंतु अभ्यासाव्यतिरिक्त छापील शब्दांचा खूप मोठा पसारा जगात आहे आणि त्या शब्दांशी यारी-दोस्ती झाली पाहिजे, केली पाहिजे हा संस्कार नकळत त्यांच्या छंदामुळे माझ्यावर झाला. वाचण्याचा संस्कार होता होताच, लिहिण्याचाही झाला तो माझ्या बाबांमुळे!

माझी आजी निरक्षर होती, तिला फक्त 'जनाबाई' असे स्वत:चे नाव लिहिता येत असे. परंतु तिला पुस्तकांचे वेड होते. आईच्या वाचनाला ती नेहमी प्रोत्साहन देत असे आणि आईचं एखादं पुस्तक जसं जसं वाचून होई तशी त्या पुस्तकाची 'स्टोरी' तिनं सांगावी असा आग्रह आजी धरायची. गावात लायब्ररी होती आणि एक फिरतं वाचनालय होतं. दोन मोठ्या कापडी पिशव्या सायकलच्या हँडलला लटकावून, दात वर आलेला एक सडपातळ गृहस्थ मासिकं-पुस्तकं घेऊन यायचा. आई शाळेत शिक्षिका होती त्यामुळे तिला ही फिरती लायब्ररी बरी वाटायची. त्याच्याकडून हंस, मोहिनी, वहिनी, विशाखा असल्या मासिकांचा घरी राबता असे. त्या वयात या मासिकांमधील कथा कळत नसत, परंतु त्या मासिकांवरचा 'जे.डी.खुणे, वाचनालय, मानोरा, पुस्तक तीन दिवसात परत करावे' असा शिक्का आठवणीत राहिला आहे.

आम्ही भावंडांनी पुस्तकं वाचावीत परंतु ती केवळ उन्हाळ्याच्या सुट्टीत असा एक नियम होता. त्यामुळे परीक्षा संपली की नगर वाचनालयात जाऊन 'पाच रुपये अनामत रक्कम आणि एक रुपया महिना' या बोलीवर आम्ही भावंडं सदस्य होत असू. लायब्ररीत जाऊन आपण कपाटातली पुस्तकं हाताळतो आहोत या कल्पनेनंच अंगावर शहारे येत असत. लायब्ररीचा जुनाट पुस्तकांचा खास असा एक सुवास असतो, तो नाकात भरून घ्यावासा वाटत असे. परंतु तिथं जो खुरखुरिया नावाचा ग्रंथपाल होता, तो दहा-पंधरा मिनिटं झाली की दरडावत असे आणि ओरडत असे, ''एऽऽ लवकर काढ रे पुस्तक!'' आणि मी त्याला का कोणास ठाऊक, प्रचंड भीत असे. अर्थात सुट्टीच्या दोन महिन्यांत बालविभागातील सर्व पुस्तक वाचून संपवणं हा एक शिरस्ताच झाला होता. 'गलीव्हरच्या सफरी', 'ठेंगू लोकांच्या देशात', 'चांदोबा', 'सोनाली', 'राजकन्या आणि उडता घोडा' अशी पुस्तकं तिथं असत. दुर्दैवानं पाडगावकरांच्या किंवा विंदांच्या बालकविता बालवयात हाती नाही पडल्या. त्यामुळं 'जादूच्या प्रदेशातली भटकंती' असंच त्या दोन महिन्यांचं स्वरूप असे!

माझी मोठी बहीण मॅट्रिकला गेली आणि तिचं बाल वाचक या वर्गातून प्रमोशन होऊन ती 'प्रौढ वाचक' बनली. त्यामुळे लायब्ररीतून जरा वेगळी पुस्तकं घरी येऊ लागली आणि मी जरी आठवीत असलो तरी ती भली मोठी जाड पुस्तकं हाती पडू लागली. मोठ्ठं काहीतरी वाचण्याचा नाद आणि ते वाचण्यासाठीची चिकाटी नकळत येऊ लागली. प्रौढ वाचनाचे ते प्राथमिक संस्कार

करणारे 'महाग्रंथ' म्हणजे स्वामी, छावा, ययाती, मंत्रावेगळा, दर्या भवानी, कौंतेय अशी पुस्तकं. ना.सं. इनामदार, रणजित देसाई, वि.स. खांडेकर, गो.नी. दांडेकर ही सगळी मंडळी मनात तेव्हा रुतून बसली. मग माझ्या बहिणीच्या हातात कधी ना.सी. फडके तर कधी व.पु.काळे दिसू लागले. माझाही या लेखकांशी परिचय होऊ लागला.

दरम्यान मी मॅट्रिक झालो आणि सायंकाळच्या वेळी नीटनेटके कपडे घालून मित्रांसोबत चौकात गप्पा मारत उभं राहणं. वगैरे मला 'ग्रेट' वाटू लागलं. कधी तंबाखूचा मावा खाऊन बघ, कधी सिगारेटचा दम मारून बघ अशी प्रौढत्वाची लक्षणं येऊ लागली. घरात अजूनही सगळं जेवण शुद्ध शाकाहारी असतं. त्यामुळे मित्रांसोबत बाहेर अंड्याचं ऑम्लेट खाणं किंवा अंडाकरी खाणं हे सुद्धा मला पुरुषार्थाचं लक्षण वाटू लागलं. छोट्या गावांमध्ये त्याकाळी सिनेमाचं थिएटर आणि बस स्टॅन्ड ही दोनच ठिकाणं वर्दळीची, गर्दीची असत. मित्रांसोबत बस स्टॅन्डवर टाइमपास करता करताच बस स्टॅन्डवरील बुक स्टॉलवाल्याशी ओळख झाली. गावातील कॉलेजात लेक्चरर असलेले प्राध्यापक शरद पद्मावार यांच्या मालकीचा तो बुक स्टॉल होता आणि तिथं बसणारा अशोक नावाचा मुलगा माझा मित्र झाला. घरी 'तरुण-भारत' येत असे आणि बुक स्टॉलवर बसल्या बसल्या सगळीच वृत्तपत्रं चाळता येत असतं. त्यामुळे शाळेव्यतिरिक्त मिळालेला वेळ मी तिथं घालवू लागलो. त्यावेळी गावातल्या ग्रंथालयासाठी म्हणून मुंबईची 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता' आणि 'टाइम्स ऑफ इंडिया' ही दैनिकं तेव्हा पोस्टानं स्टॉलच्या पत्त्यावर येत असत. त्यामुळे ती वाचण्याचा छंद लागला.

स्टॉलवर पुस्तकं मुख्यत: होती ती हिंदी पॉकेट बुक्स. आपण ज्या अर्थानं 'मराठी पुस्तकं' म्हणतो तशी कथा-कादंबऱ्या विकणारी दुकानं गावात २५ वर्षांपूर्वी नव्हती आणि आजही नाहीत. गावात सुबत्ता, श्रीमंती आली, चांगली हॉटेलं आली, मुलांच्या शिक्षणाविषयीची जागरूकता वाढली परंतु अजूनही गावात मराठी पुस्तकाचं दुकान मात्र नाही. तर, त्या बुक स्टॉलवर मुख्यत: होती ती हिंदी पॉकेट बुक्स आणि तीच वाचून संपवण्याचा मी सपाटा लावला. सकाळी ११.३० वाजता शाळेतून घरी आलो की जेवून मी स्टॉलवर जात असे आणि दुपारी ४-५ पर्यंत वाचत बसत असे. तिथं बसणारा मुलगा माझ्यावर 'स्टॉल' सोडून जेवायला, भटकायला बिनधास्त निघून जात असे. आणि मी बुक स्टॉलवर वाचत बसतो हे माहीत असल्यानं घरूनही आडकाठी नव्हती. मग काय, गुलशन नंदा, समीर, राजू, वासुदेव, प्रेम वाजपेयी यांची ३००-४०० पानांची पॉकेट बुक्स संपवण्याचा झपाटा लावला. शंभर दोनशे पुस्तकं वाचली असतील आणि मग त्यातल्या कौटुंबिक कथानकाचा, साचेबद्ध व्यक्ति-रेखांचा उबग आला, कंटाळा आला आणि फॉर्म्युलाही माहीत झाला. मग मी त्या सगळ्यांकडे तिरकस नजरेनं पाहू लागलो. असहाय, नाडली गेलेली नायिका हे या सर्वच पुस्तकांचं वैशिष्ट्य असे, अर्थात नायिकेच्या रडण्याचे त्यात वर्णन असे. त्या रडण्याला किती विविध प्रकारची विशेषणं लागली जातात याचा मी गंमत म्हणून एकदा शोध घेतला. बिलख बिलखकर रो पडी, फूटफूटकर रो पडी, फणक फणफकर रो पडी उमड उमडकर रो पडी, आंसू बहने लगे, आंसूओं की धाराए फूट पडी, आँखो से मोती बहने लगे, गिडगिडाकर रोने लगी, कंधेपर सर रखकर चूपचाप आंसूओ को रास्ता दे दिया... वैगेरे!

या कौटुंबिकतेचा कंटाळा आला आणि मग मी 'जासुसी पॉकेट बुक्स'कडे वळलो. हिंदी लेखकांची एक नवी फळी परिचयाची झाली. सुरेंद्र शर्मा, सुनील शर्मा, कर्नल रंजीत, जनप्रिय ओमप्रकाश शर्मा, लोकप्रिय ओमप्रकाश शर्मा, वेद प्रकाश काम्बोज, सुरेंद्र मोहन पाठक! यांपैकी जनप्रिय ओमप्रकाश शर्मांची पुस्तके गुन्हेगारी, साहस आणि विनोद यांनी भरलेली असत. उदाहरणार्थ त्यांचं बंदूक सिंह नावाचं एक पात्र होतं. त्याचा उल्लेख ते नेहमी 'गनटायगर' असा करत. किंवा हिंदीत 'दिल बाग बाग हो गया' असा एक शब्दप्रयोग आहे. त्याचं ते हिंदी-इंग्लिश असं रूपांतर करीत, 'दिल गार्डन गार्डन हो गया'.

या जासुसी पुस्तकांच्या शोधात एक वेगळाच प्रकार हाती लागला. 'खुनी पंजा' नामक एक प्रकाशनगृह. उत्तरेतलं कुठलं तरी ते प्रकाशन होतं आणि फक्त गुप्तहेर कथा प्रकाशित करीत असे. त्यांच्याकडे इब्ने शफी नामक एक लेखक होता. कर्नल विनोद आणि कॅप्टन हमीद यांची जोडी त्यात मध्यवर्ती असे. या जोडीची सर्वच कथानकं वेधक असत. आधी त्यात या दोघांचं थट्टामस्करीचं नातं खूपच धमाल करीत असे. अशीच एक मस्त जोडी पुढे बाबुराव अर्नाळकरांच्या झुंजार-आनंदराव या दोन व्यक्तिरेखांच्या रूपात मराठीत भेटली. तर ह्या सर्व गुन्हेगारी, गुप्तहेर साम्राज्यातली ही दोस्त मंडळी त्याकाळी घट्ट मैत्रीतली झाली होती. सुरेंद्र मोहन पाठक यांच्या कथानकांमधील सुनील हा नायक आणि त्याच्या प्रत्येक अडचणीच्या वेळी हमखास उपयोगी पडणारा रमाकांत, कर्नल रंजीत यांच्या पुस्तकातला, एखादा महत्त्वाचा क्ल्यू सापडताच शीळ वाजवणारा मेजर बलवंत (याचे वर्णन ते और मेजर बलवंत के होठ गोल हो गये असं करीत) आणि त्यांची साहाय्यक डोरा, ओम प्रकाश शर्मा यांच्या कादंबऱ्यांमधला जगावर राज्य करण्याची स्वप्न पाहणारा सिंगही नामक धूर्त खलनायक!

हिंदी भाषेची गोडी लागली आणि मग आणखी एक पायरी चढून मी शरदचंद्रांच्या हिंदीत अनुवाद झालेल्या कथा, आचार्य चतुरसेन यांची महाभारतावरील पुस्तकं, प्रेमचंदांच्या कादंबऱ्या, हरिवंशराय बच्चन यांचं 'मधुशाला' यांच्या नादाला लागलो. त्या बुक स्टॉलवर चंद्रकांत काकोडकरांची एक कादंबरी आणि जयंत नारळीकर यांचं 'यक्षाची देणगी' नामक विज्ञानकथांचे पुस्तक एवढाच मराठी ऐवज होता. बुक स्टॉलवर

पुस्तकं वाचण्याचा एक मोठा फायदा मला असा झाला की 'पुस्तक जराही खराब होऊ न देता' वाचायची सवय लागली. खुणेसाठी पुस्तकाचे पान दुमडून ठेवणाऱ्यांविषयी मनात तेव्हापासून तिडिक निर्माण झाली ती आजही कायम आहे!

चंद्रकांत काकोडकरांचं स्टॉलवरचं एकुलतं एक पुस्तक मी एकदा घरी वाचायला घेऊन गेलो. अगदी एकाग्र होऊन वाचत होतो, 'त्याने तिच्या पोलक्याची बटणे काढली आणि तिचे अनावृत्त स्तन फडफडत बाहेर पडले' असं काहीतरी वाक्य होतं. रक्त गरम झालं, आपण काय वाचतो आहोत हे कुणी पाहत तर नाही ना म्हणून आजूबाजूला पाहून घेतलं. नेमकी तेव्हाच माझी आई जेवून जरा अंग टाकायला म्हणून तिथं आली. झोप येईस्तोवर काहीतरी तिला वाचायला हवं होतं म्हणून ती मला म्हणाली, ''बघू जरा ते पुस्तक!'' माझ्या हातातलं पुस्तक मी तिला दिलं. परंतु माझी टरकली होती, कारण पाचव्या-सहाव्या पानावरचं ते रक्त गरम करणारं वर्णन होतं. आईच्या हाती पुस्तक देऊन मी बाहेर सटकलो. उन्हात भटकून तासाभरानं घरी आलो तो भीतभीतच. पाहतो तो आई झोपली होती, तिच्या पोटावर पुस्तक पडलेलं होतं आणि तिनं जेमतेम दोन पानंच वाचली होती. तडक ते पुस्तक उचललं आणि स्टॉलवर नेऊन त्याच्या जागी ठेवून दिलं!

त्यानंतर शिक्षणासाठी यवतमाळला आलो. सुदैवानं मी राहत होतो तिथंच 'चंद्रकांत वाचनालय' सुरू झालं. चंद्रकांत रिठे नामक एका तरुणानं ते सुरू केलं होतं. तो लवकरच मित्र झाला. परंतु त्याच्याकडे खास 'लायब्ररीची' पुस्तकंच मुख्यत: होती. बाबा कदम, सुहास शिरवळकर, व.पु.काळे वगैरे. मात्र त्याच वाचनालयामुळे पु.ल. देशपांडे, जयवंत दळवी यांचीही काही पुस्तकं हाती लागली. तोवर मी पुलंचा अभ्यासाला असलेला बँकॉक प्रवास वर्णनाचा धडा आणि 'बटाट्याची चाळ'चा काही भाग फक्त वाचला होता. अपूर्वाई, पूर्वरंग, गणगोत, हसवणूक असं बरंच काही मग वाचायला मिळालं. दळवींचं 'सारे प्रवासी घडीचे', 'चक्र' यांच्याशी गाठ पडली आणि 'ललित' मासिक वाचायला मिळालं. तेव्हा मला 'ठणठणपाळा'ची ओळख झाली. परंतु ते दळवी लिहितात हे पुढं नंतर कळलं. तेवढं साहित्यिक माहितीचं वारं तिथं पोचलेलं नव्हतं. (हेच ठणठणपाळ यांच्याशी कधीतरी आपली तुलना होईल, हे तेव्हाच काय, आताही स्वप्नवत वाटतं!) कॉलेजमधील भित्तिपत्रकात त्यावेळी मी 'अबोली, बोल ना गं!' अशा शीर्षकाचा एक लेख लिहिला. ते वाचून मग हळुहळू पुस्तकाच्या जगात रमणारे मित्र अवती-भवती गोळा झाले आणि अगदी तीन तऱ्हांच्या तीन पुस्तकांनी तेव्हा माझी आवड आरपार बदलून टाकली! एक म्हणजे गो.पु. देशपांडेंचं 'उद्ध्वस्त धर्मशाळा', दुसरं जयवंत दळवींचं 'बॅरिस्टर' हे नाटक आणि तिसरं भालचंद्र नेमाडे यांचं 'कोसला'. मग माझ्या वाचनाला एक दिशा मिळाली.

तोवर कवितांची पुस्तकं अशी फार वाचली नव्हती. कवींची नावं माहीत होती ती पाठ्यपुस्तकांमुळे. अशातच एकदा गावी घरी असताना 'ग.दि. माडगूळकर यांचे निधन' ही बातमी वृत्तपत्रात आली. ती वाचून माझे बाबा रडले तेव्हा आपण कविता वाचत नाही, या क्षेत्राशी फार ओळख नाही यांचं मनातून वाईट वाटलं. त्याच दिवशीच्या एका लेखात माडगूळकरांच्या 'जोगिया' या कवितेचा उल्लेख होता आणि 'घनश्याम नयनी आला, सखे मी काजळ लावू कशाला' अशा एका अन्य कवितेच्या ओळीही होत्या. मग काही महिने मी कवितांनी झपाटून गेलो. बोरकर, मर्ढेकर, आरती प्रभू, पाडगावकर, करंदीकर यांचे मिळतील तेवढे संग्रह वाचून काढले. त्यातलं कळलं किती होतं ते माहीत नाही. परंतु कवी कवींमधील फरक लक्षात येऊ लागला. 'हवेतुनि मग खिदळत आले स्तनाकार काचेचे प्याले' अशा ओळी लक्षात राहू लागल्या होत्या. वसंत बापटांची 'फुंकर' ही कविता तर कोवळ्या वयातील समस्त प्रेमुत्सुक तरुणांचं प्रणयसुक्तच!

यवतमाळमधली दोन वर्षे मला श्रीमंत करून गेली, कारण एक तर त्याच वयात मला 'स्वामी' आणि 'कोसला' ही दोन टोकं असल्याचं भान आलं आणि धर्मेन्द्र-जितेन्द्र यांचे चित्रपट आवडीनं पाहणाऱ्या मला एक दिवस श्याम बेनेगल यांच्या 'कलयुग'नं हाताला धरून चित्रपटांचं वेगळंच जग दाखवलं.

पुढे संघर्ष करण्यासाठी, नशीब आजमावण्यासाठी मुंबईत आलो. नोकरी-साठी खटपट करण्यातून वेळ काढून आधी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय शोधलं. तिथल्या संदर्भ विभागात दिवसभर बसून फुकट पुस्तक वाचता येतं याचा शोध लागला आणि प्रत्येक रिकामा दिवस तिथं घालवू लागले. त्याच काळात जी.ए. कुलकर्णी, खानोलकर, रॉय किणीकर यांची गाठ पडली. भैरप्पा सापडले.....!

त्यानंतर काही काळ या सर्व वातावरणापासून दूर तांत्रिक क्षेत्रात गेलो. माझ्या सुदैवानं मला तिथून ओढून आणलं आणि पत्रकार केलं आणि पुस्तकाचं जगच सामोरं आलं. पाठोपाठ 'प्रभात'मुळे चित्रपटाच्या जगाची सफर घडू लागली. तेंडुलकरांचे चित्रपट आधी ओळखीचे झाले आणि मग लेखक म्हणून त्यांना मी वाचू लागलो. पत्रकारितेचं अबकड 'सकाळ' मध्ये शिकत असतानाच सोमनाथ पाटील यांनी पर्ल बक यांची एक इंग्रजी कादंबरी वाचायला दिली. तोवर मी इंग्रजी कादंबरी हातातसुद्धा धरली नव्हती. मी वाचलेलं ते पहिलं इंग्रजी पुस्तक. त्यानंतरच्या माझ्या १६-१७ वर्षांच्या वृत्तपत्रीय आयुष्यात मी हाती पडेल ते वाचत आलो आहे. 'काय वाचायचं नाही' हे मनाशी स्पष्ट असतं त्यामुळं सोपं होतं. योगायोगानं चित्रपटांवर लिहू लागलो. त्यामुळे संदर्भ म्हणून चित्रपट-विषयक पुस्तकं जमा करू लागलो. हळुहळू इतरही. स्वत:च्या पैशांनी पुस्तक विकत घेण्याची ऐपत आली तेव्हा मात्र मी पहिलं विकत घेतलं ते 'कोसला'!

नोकरी करत करत गाजलेली पुस्तकं

मिळवून वाचण्याचा सपाटा लावला. शिवाय नवं काय येतं याकडेही डोळसंपणे लक्ष देऊ लागलो. परंतु एका विशिष्ट प्रकारचं, काही विशिष्ट लेखकांचं वाचायचं अशी काही शिस्त तेव्हाही नव्हती आणि आताही नाही. गेल्या पंधरा वर्षात आवडलेल्या पुस्तकांची नुसती नावं लिहायची म्हटली तरी मोठी यादी होईल. आयुष्य आणि वेळ भराभरा सरकत जातात. वाचायचं, लिहायचं आणि पाहायचं खूप बाकी आहे. ते सगळं कसं जमेल, जमेल की नाही या विचारानं पोटात गोळा येतो. आताही एका बाजूला ओरहान पामूकचं 'म्युझियम ऑफ इनोसन्स'चं वाचन सुरू असतं आणि त्याचवेळी नंदा खरेंच्या 'मानव जातीच्या इतिहासाची बखर' वाट पाहत असते. अर्धवट असलेली कादंबरी फुरंगटून बसलेली असते तर वेळ मिळेत तशा पाहू म्हणून आणून ठेवलेल्या चित्रपटांच्या डीव्हीडी ड्रॉवरमध्ये श्वास घेत पडलेल्या असतात. पत्रकार म्हणून लेख, सदरं लिहिणं सुरू असतं. कधी सदर वाचून कोणीतरी जाणकार व्यक्ती आपुलकीनं फोन करते आणि म्हणते, ''श्रीकांत, तुझ्यासारख्यानं बर्नाड शॉ आणि पी.जी. वूडहाऊस वाचलाच पाहिजे!'' तेव्हा घरातील कपाटात वूडहाऊसचं कलेक्शन आपण आणून ठेवलं आहे याची आठवण येऊन छातीत धडधडू लागतं. गणिताचा तास आला की शाळेत जसं धडधडू लागे तसंच!

जे जे पाहायचं, वाचायचं, ऐकायचं आहे ते सगळं कधी होईल कोणास ठाऊक! खरं तर, होणारच नाही. कारण लिहिणाऱ्यांचे हात हजारो आहेत आणि आपली आयुष्याची झोळी दुबळी आहे!

---

**– श्रीकांत बोजेवार**
ए/६, पत्रकार बिल्डिंग,
मीठ बंदर रोड, कोपरी बंदर रोड,
ठाणे (पू.)-४०० ६०३.
भ्रमणध्वनी- ९८९२४ १९२६७.

---

# जन्म वाचनाचा व्हावा

## राजन खान

आयुष्यात वाचनाचं गारुड पडण्याचा, वाचनाची बाधा किंवा लागण होण्याचा, वाचनाच्या झपाट्यात अडकण्याचा एक क्षण यावा लागतो, तो आला की माणूस पुढं आयुष्यभर वाचनाच्या मोहक भुताटकीत अडकून राहतो. तो क्षण बहुधा माणसाच्या वयात येण्याच्या वयात येतो. (ग्रंथप्रसार करणारांना प्रत्येक मुलाच्या आयुष्यातला तो क्षण हेरता आला न् पकडता आला तर वाचनसंस्कृतीचं संवर्धन निश्चितच होऊ शकतं.)

माझ्या आयुष्यात मात्र तो क्षण वयात येण्याआधीच आला. साधारण आठव्या-नवव्या वर्षी. त्यावेळी फार आकलनात येत नसतानाही बाबूराव अर्नाळकथांची कुठली तरी एक रहस्यकथा वाचली. तिनं झपाटून गेलो. ते काही तरी रम्य आणि मन लुभावणारं वाटलं. तो माझा सगळा काळ मानसिक एकटेपणाचा होता. त्या वयात भोवतीच्या माणसांचा मनाला आधार लागतो. तो वेगवेगळ्या कारणांनी मला मिळाला नाही. मी मनानं एकटा पडल्यागत झालो. त्यात चुकून ती रहस्यकथा माझ्या हाती आली न् एकटेपणाला आधार सापडून गेला. फार कळत नसतानाही रहस्यकथेच्या त्या गूढतेत मी रमून गेलो. मग तशा रहस्यकथा आणखी कुठं मिळतात का, ते शोधू लागलो. तर तसल्या रहस्यकथांची दुकानं (सहसा जुनाट, फारसं कुणी न फिरकणारी अशी) सापडली. हे मी जुन्नरला असताना व नसरापूरला असताना (जि. पुणे) घडलं. खिशात पैसे नसायचे. पण हिकमती करुन मी या रहस्यकथा मिळवून वाचल्या. दोनतीन वर्षं अशी गेली. त्या दोनतील वर्षांत छापील कागदही वाचण्यासाठी असतात, हा धडा मनावर बिंबत गेला न मग समोर येईल तो छापील कागद वाचायचा नाद लागला. त्यातनं मग वर्तमानपत्रांचे रद्दी तुकडे (तोवर आमच्याकडं वर्तमानपत्र विकत घेण्याची पद्धत नव्हती. ते सांस्कृतिक उत्थान आमच्या घराचं नंतर झालं. सुरुवातीला वर्तमानपत्र घरोघरी येत हा मला चमत्कार वाटायचा. ते मी अधाशागत वाचायचो. नंतर ती नेहमीची आवश्यक गोष्ट झाली. आता वर्तमानपत्र वाचायचा कंटाळा येतो. आता वर्तमानपत्रांना सांस्कृतिक मूल्यं राहिली नाहीत. किंवा नव्या काळाची नवी सांस्कृतिक मूल्य जन्माला आली असतील, ती माझ्या पचनी पडत नाहीत.) आणि चुकून कुठं मिळालीच तर इतर पुस्तक वाचनात येऊ लागली.

नऊ-दहाच्या वयातच मी एक क्षुल्लकसा छंद केलेला आठवतो. वर्तमानपत्रांत चित्रपटांच्या जाहिराती येत. त्यातली माहिती मी एका वहीत नोंदवून ठेवत असे. चित्रपटाचं नाव, निर्माता, दिग्दर्शक, कथाकार, पटकथाकार, संगीतकार, कलावंत यांची नाव लिहित असे. काही चित्रपट तोवर पाहायला मिळाले होते. न सातत्यानं चित्रपट पाहायला मिळण्याची वातावरणाची न पैशांची औकात नव्हती. तो मोह भागवण्यातून कदाचित चित्रपटांच्या जाहिराती लिहून काढण्याचा छंद लागला असावा. त्यासाठी पुन्हा वर्तमानपत्र विकत घेण्याची ऐपत नव्हती. तर मग मी रस्त्यावर सापडतील तिथून वर्तमानपत्रांचे तुकडे गोळा करुन आणत असे, किराणा मालाच्या कागदाचे तुकडे जमवत असे. घरात अशा कागदांचे ढीग जमले होते तेव्हा. ते कागद

वाचण्यातूनही वाचनाचं वेड लागत गेलं.

रहस्यकथांचा तोच तोचपणा लवकरच लक्षात येऊ लागला न मन आपोआपच इतर पुस्तकं धुंडू लागलं. काही लोकांकडं दुर्मिळपणे हा होईना पुस्तकं आढळत जुनीपानी. ती उसनी मागून वाचता येतात हे कळलं. नसरापूर, पानशेत अशा पुण्याच्या आसपासच्या गावांमध्ये हे घडलं. नंतर आम्ही ओतूरला गेलो. तिथं पहिल्यांदा आयुष्यात बारकसं वाचनालय आलं. वाचनाला बहर आला. नियतकालिकं, पुस्तकं यांची विविधता आयुष्यात आली. पुस्तकांची उसनावळ वाढली. पुढं जाईन त्या गावात वाचनालयाशी जोडून घ्यायची सवय लागली. किंबहुना ते अपरिहार्य झालं. काही आवडलेली पुस्तकं स्वतःची असावीत अशी इच्छा सुरु झाली न जमतील तिथून पैसे जुळवून पुस्तकं विकत घेऊ लागलो. 'सारिका'सारखं दमदार हिंदी नियतकालिक वाचनात आलं. त्यात जाहिरात पाहून घरेलू पुस्तक योजनेतली हिंदी पॉकेट बुक्स नियमित मागवायची सवय लागली.

पुढं तर मी संपादन क्षेत्रातच आलो. दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, षण्मासिक, वार्षिक अशा सर्व प्रकारच्या नियतकालिकांची संपादन केली. त्यात बातम्यांपासून माणसाच्या जगण्याचा विविध अंगाच्या विषयांपर्यंत सर्व काही होतं. चळवळी, समाज पाककला, सौंदर्य, आरोग्य, शिक्षण, शेती, लैंगिकता, लहान मुलं, महिला, वैचारिक, विद्यार्थी, साहित्य, इत्यादी इतक्या वेगवेगळ्या विषयांची संपादनं झाली की वाचनाची अगदी खिचडी झाली. भोवतीचा कोणताही विषय वर्ज्य राहिला नाही. त्यातच निरनिराळ्या प्रकाशकांच्या निरनिराळ्या विषयांच्या पुस्तकांची संपादन केली. त्यानंही दांडगं वाचन झाल. याशिवाय स्वतःच्या आवडीचं वेगळं वाचनही चालूच राहिलं.

मला अक्षरांचं विश्व मोहात पाडतं. स्वतःशी जखडून ठेवतं. किंबहुना वाचन हेच आपल जगण असावं असं वाटतं. वाचनासाठी आपल्याला लाखो वर्षांचं आयुष्य मिळावं असं वाटतं. जगात रोज लाखो पुस्तकं जन्माला येतात. मी जन्माला येण्याआधी अब्जावधी पुस्तकं जन्मली आहेत. त्यातली रोज आपण किती वाचणार? मला एक आयुष्य त्यासाठी थिटं वाटतं. असंही वाटतं की आपल्याला पोट नसतं तर बरं झाल असतं. मग आपण जगण्याचा सगळा वेळ पुस्तकं वाचण्यात घालवला असता.

आता पुस्तकामधलं चांगलंवाईट कळू लागलं आहे. स्वतःची वाचनाची आवडही तयार झाली आहे. खूप खोल आशयविषयाची, उदात्त मानवीपण व्यक्त करणारी, अनोख्या संदर्भांची आणि जे मला माहित नाही ते सांगणारी पुस्तकं मला आवडतात. वरपांगी, लिहायची म्हणून लिहिलेली पुस्तकं मला आवडत नाहीत. पण पुस्तकांची एक गंमत असते. कोणतंही पुस्तक उघडून वाचल्याशिवाय ते चांगलं आहे की वाईट ते कळत नाही. ते ठरवण्यासाठी पुस्तक वाचावंच लागतं. त्यातून चांगलं काही वाचलं की आयुष्यात भरीव, मोलाचं काही तरी घडल्यागत वाटतं. पण वाईट काही वाचलं की, आपल्या आयुष्याचे दुर्मिळ असे, पुन्हा न मिळणारे, मोलाचे क्षण वाया गेले असं वाटतं. त्यामुळं मला नेहमी असं वाटतं की, आपल्याकडं अशी काही तरी दिव्य शक्ती असायला हवी की, आपण नुसता पुस्तकावर हात ठेवला तरी, पुस्तक चांगलं आहे की वाईट ते कळावं. त्यातून या अपुऱ्या आयुष्यात जो काही अल्प वेळ वाचायला मिळतो, तो सत्कारणी लागेल. पण तशी जादू घडणं शक्य नाही. त्यामुळं मग अशी एक बालिश इच्छा जन्माला येते की, जगात खराब लिहिणारे लेखकच नसावेत. सगळेच्या सगळे लेखक फक्त चांगलेच असावेत किंवा लेखकांनी फक्त चांगलं चांगलंच लिहावं आणि आपल्यासारख्याला त्यातून किती वाचू न किती नको असं होऊन जावं.

मी आता असं ठरवतोय की उरलेलं आयुष्य कुठं तरी एकांतात जाऊन राहावं. तिथं लोकसंपर्क नको, फोन, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्र, असं काहीही नको. तिथं जगातली उत्तमोत्तम पुस्तकं जमवावीत आणि वाचावीत दिवसरात्र न मरेपर्यंत तसंच राहावं. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत फक्त आपले डोळे आणि मेंदू वाचनासाठी शाबूत राहावा आणि जेव्हा कधी मरण येणार असेल तेव्हा जगातला सर्वोत्तम असा एखादा ग्रंथ संपूर्ण वाचून झाल्यावरच आबदार मरण यावं. बाकी आयुष्याकडून फार काही मागणं नाही.

---

**– राजन खान**
अक्षर मानव,
पवनपुत्र राष्ट्रभूषण चौक,
शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ,
पुणे – ४११००२.

सारस्वत बँकेचे अध्यक्ष
**एकनाथ ठाकूर** यांच्या हस्ते

**१८ एप्रिल रोजी प्रसिद्ध होत आहे...**

कोहिनूर हॉल, दादर (पूर्व), मुंबई–१४
सायंकाळी ५.०० वाजता

## पंखाविना भरारी! - शरयू घाडी

प्रसाद हा अतिविकलांग मुलगा. कोपरापुढे हातांची होणारी मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगी एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. असा हा प्रसाद आपल्या इच्छाशक्तीने, कर्तृत्वाने केवळ एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात एक दंतकथा बनला. शिक्षण, गायन, वक्तृत्व, चित्रकला यातील त्याने केलेली कामगिरी आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देते. प्रसाद म्हणजे निसर्गाचा अनाकलनीय आविष्कार. त्याच्या जीवनाची आणि त्याच्या आई–वडिलांच्या समर्पणाची ही कहाणी आहे.

# ग्रंथांचा सहवास

## डॉ. ज्योती लांजेवार

लहानपणापासून मला मिळालेला पुस्तकांचा सहवास मोठा मजेशीर आहे. वाचनाची मला खूप आवड होती. हातात येईल ते पुस्तक; कोणत्याही विषयाचे असो; विशेषत: इतिहास वाचायला आवडत असे. माझी आई शिक्षिका होती. तिला वृत्तपत्रे, मासिकांतील छापून येणाऱ्या कथा, कविता, बडबड गाणी, गंमत-जंमत, चुटके वाचायची आवड होती. ती त्याची कात्रणे एका मोठ्या फाईलमध्ये लावून ठेवीत असे. मलाही ती कात्रणे वाचायची सवय जडली. मी पाचवीत असतानाच सानेगुरुजींच्या 'श्यामची आई' आणि 'आपण सारे भाऊ-भाऊ' या दोन कादंबऱ्या वाचून काढल्या होत्या. माझे आजोबा आणि त्यांचे एक सहकारी हरिभाऊ मेंढे (ज्यांना 'साधुबोवा' म्हणत) हे दोघेही भागीदारीत रद्दीचा व्यवसाय करत असत. रद्दीत येणाऱ्या पुस्तकांच्या ढिगांमधून मला हवी ती पुस्तके कथा, कविता, चांदोबा, अमृत इत्यादीसारखी मासिके वाचायची सवय लागली. मी माझा बराचसा वेळ वाचण्यात घालवत असे. कधी-कधी वाचनाच्या नादात खेळायला जाण्याचेही विसरून जाई. पुस्तके निवड करण्यासाठी त्यावेळी आईकडून मार्गदर्शन मिळे. उद्‌बोधक पुस्तके, चांदोबातील कथा इत्यादींविषयी माझ्याशी ती चर्चा करी. वाचनाचा माझ्या बोलण्या-लिहिण्यावर, भाषेवर आणि जीवनावरही फार मोठा प्रभाव आहे.

माझे बालपण नागपुरातील इमामवाडा आणि त्याला लागून असलेल्या रामबाग झोपडपट्टीत गेले. त्या काळात आजोबा सावकारी करत असत. दारू पिऊन तडातडा भांडणारी माणसे आजुबाजूला होती. मागास जातीतील अनेक जातीच्या लोकांचे इथे वास्तव्य होते. त्या सगळ्यांची भाषा, एकमेकांशी बोलणे, शिव्या देणे, भांडणे, लहान-सहान गोष्टींसाठी एकमेकांवर चाकू-सूऱ्या चालवणे, व्यसनाधीन लोकांचे बरळणे, नित्यनेमाने चाललेला कोलाहल, नळावरील बाया-बापड्यांची भांडणे, असा लोकांच्या जगण्याचा क्रम असला तरी पुस्तकांनी माझे जीवन सावरले. आईच्या संस्काराने मला घडवले. माणसाकडे 'माणूस' म्हणून पाहायला शिकवले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत तसेच समता सैनिक दलात काम करणारे आजोबा, चळवळीत वावरणारे आमचे सबंध कांबळे कुटुंबीय, महिला मंडळ आणि नंतर दादासाहेब गायकवाडांच्या चळवळीत, दीक्षाभूमीच्या स्मारक समितीत कार्य करणारी माझी आई. तिच्या कार्याचा प्रभाव आणि सोबतीला पुस्तकांचा माझ्या जीवनावर पडलेला प्रभाव, माझ्या आजच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत मोलाची भर घालणारा आहे.

शालेय तसेच महाविद्यालयीन जीवनात वा.म. जोशी, मामा वरेरकर, जयवंत दळवी त्याचबरोबर बाबुराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा वाचण्याची सवय लागली. याच दरम्यान शरदचंद्र, मुन्शी प्रेमचंद्र, सुमित्रा नंदन पंत, कुशवाह कांत, बंकीमचंद्र, प्यारेलाल आवारा, गुलशन नंदा यांच्या कादंबऱ्यांनीही माझे वाचन, अभिरुची बदलली.

करंदीकरांनी लिहिलेले 'सावरकरांचे चरित्र' आणि लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे' यांचाही प्रभाव माझ्या जीवनावर राहिला. पुढे अमृता प्रीतम यांचे 'रसिदी टिकट' आणि मोहन राकेश यांचे 'लहरों के राजहंस' या दोन पुस्तकांचा प्रभाव माझ्या मनावर राहिला. पाली साहित्यातील 'थेरीगाथा' या २५०० वर्षांपूर्वीच्या थेरीच्या काव्यात्मक आत्मचरित्राने माझे मन झपाटून टाकले. अलीकडची 'बलुतं' किंवा 'उचल्या', 'अक्करमाशी' किंवा 'बिऱ्हाड' या आत्मकथनांनी एकूणच समाजातील भीषण वास्तव उजागर केले. या वास्तवामुळे समाजातील उपेक्षित घटकांच्या वेदना, व्यथांचे, जगण्या-भोगण्याचे आलेखच साकारले गेले. 'माझ्या जल्माची चित्तर-कथा', 'जिणं आमुचं', 'मिटलेली कवाडे' या दलित स्त्रियांच्या आत्मकथनांनी मला अंतर्मुख केले. नंतरची दलित स्त्रियांची वा पुरुषांची आत्मकथने तेवढी परिणामकारक वाटली नाहीत.

आज समाजाची अभिरुची बदलत आहे. आर्थिक सधनता आणि प्रकाशझोतात येण्याच्या हव्यासापोटी मराठीतील ग्रंथ-व्यवहार योग्य होत नाही. यामुळे वाचनसंस्कृती आणि ग्रंथसंस्कृतीही टिकवणे अशक्य होईल. त्यासाठी समाजाभिमुख लेखन आणि जीवन विकसित आणि उन्नत करणारी साहित्यसंपदा प्रकाशित करण्याचा मानस सामाजिक बांधिलकीतून प्रकाशकांनी स्वीकारला तर वाचकांची अभिरुची जोपासता येईल. कोणताही वाङ्मयप्रकार असो, तो प्रकाशित करताना त्या लेखकाची सामाजिक बांधिलकी कितपत प्रखर आहे, साहित्यकृतीच्या केंद्रस्थानी 'समाज' कितपत येतो याची शहानिशा करणे आवश्यक आहे. सामाजिक 'बांधिलकी'चे रूपांतर 'पांगिलकीत' होऊ नये असे वाटते.

विध्वंसकतेतून विधायकतेकडे आणि विघटनाकडून संघटनेकडे नेणारे साहित्य प्रकाशकांनी वाचकांपर्यंत पोचवावे. जागतिक शोषणाला वाचा फोडण्याचे काम प्रतिभावंतांनी आणि प्रकाशन संस्थांनी करणे गरजेचे आहे.

---

**- डॉ. ज्योती लांजेवार**
९२/सी, 'सुखनिवास',
एन.आय.टी. ले-आउट,
अंबाझारी गार्डन रोड, नागपूर - ४४० ०३३
भ्रमणध्वनी - ९८८१५ १३९२१

# दुबई अनुभवाची पुनरावृत्ती होऊ नये

रंजना फडके

यंदा मार्चच्या पहिल्या आठवड्यात दुबईला झालेले दुसरे विश्व साहित्य संमेलन मी कधीही विसरू शकणार नाही. या संमेलनाच्या अनुभवाने मला प्रचंड श्रीमंत केले. मी आजपर्यंत इंग्लड, हॉलंड, कतार, श्रीलंका वगैरे सात-आठ देशांत नृत्याचे विविध कार्यक्रम केले. दुबईचा अनुभव मात्र कायम स्मरणात राहील असाच.

गेल्या वर्षी श्री. धनंजय दातार यांनी 'नवशक्ति सन्मान संध्या' सोहळ्यात मी सादर केलेली नांदी बघितली. ते खूप प्रभावित झाले आणि तेव्हाच त्यांनी 'दुबईमध्ये आम्ही तुम्हाला नक्की बोलावू' असे आश्वासनही दिले. मला दिलेला शब्द त्यांनी पाळला आणि विश्व साहित्य संमेलनाला मला आमंत्रित केले गेले. एक कलाकार म्हणून मी सुखावून गेले. महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती संजीवनी पाटील मुंबईला आल्या तेव्हा आमची भेट झाली. तेव्हा त्यांचाही संमेलनाकडे विचारपूर्वक बघण्याचा दृष्टिकोन मला पटला. आम्ही सविस्तर चर्चा करून, कोणते नृत्य केव्हा करता येईल हे ठरवले आणि माझे तीन नृत्यकार्यक्रम तीन दिवसांत कसे ठेवायचे हे मुंबईतच निश्चित झाले. त्यानुसार नांदीने कार्यक्रमाची (पर्यायाने साहित्य संमेलनाची) सुरुवात करायची असे ठरले. त्यातील काव्यसंमेलनाची सुरुवात कवितेवरील नृत्याने करायची असेही ठरले. ती कविता देखील मी विचारपूर्वक निवडलेली होती.

उद्‍घाटनाचा कार्यक्रम ६ मार्चला होता आणि ८ मार्च महिलादिन असल्याने कवियत्री संजीवनी बोकील यांनी लिहिलेली, संगीतकार आणि गायिका सारंगी आंबेकर यांनी रचलेली, मी आणि ऋजुता देशपांडे यांनी सादर करायची 'स्त्री शिक्षण' या विषयावर आधारित कविता 'माये गं माये, नगं तोडू माजी शाला' मी निवडली होती. माझा तिसरा कार्यक्रम शास्त्रीय नृत्यावर आधारित 'तराणा' हा होता. तो वसंत रागात बांधलेला होता. त्यामागे कल्पना अशी होती की साहित्य संमेलन हा शब्दांचा उत्सव आहे, सुरांचा उत्सव आहे, या शब्दसुरांनी तीन दिवस रसिकजन न्हाऊन निघाले आहेत. वसंत ऋतूचे आगमन आणि संमेलनाच्या उत्साहाचं प्रतिबिंब यातून व्यक्त करण्याचा हा प्रयत्न होता.

हे सगळे सविस्तर लिहिण्याचा हेतू असा की माझ्या नृत्याच्या कार्यक्रमाकडे मी, श्री.धनंजय दातार अथवा दुबई महाराष्ट्र मंडळ केवळ मनोरंजन म्हणून बघत नव्हतो हे स्पष्ट व्हावे. दोन बौद्धिक परिसंवादांच्या दरम्यान डोके हलके करण्यासाठी थोडा बदल हवा म्हणून नृत्याचे कार्यक्रम नव्हते. ते विश्व साहित्य संमेलन आहे याची पूर्ण जाणीव आम्हाला होती. केवळ एखादा पुरस्कार वितरण सोहळा, काही पुरस्कार द्यावे, उडत्या चालीचे एखादे गाणे घ्यावे त्याच्यावर नृत्य येणारे अथवा नृत्य न येणारे अभिनेते नृत्य करत आहेत असे स्वरूप नव्हते. त्याबद्दल आमचा कटाक्ष होता. ठरलेल्या कार्यक्रमात बदल कोणी आणि का केले याची मला कल्पना नाही. महाराष्ट्र मंडळ, दुबई यांनी अधिकृतपणे अथवा वैयक्तिक माझ्याकडे त्यांची बाजू न मांडल्याने हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. संमेलनाच्या तिसऱ्या दिवशी मी कार्यक्रम सादर करायला गेले तेव्हा रंगमंचाच्या पाठी सर्व कार्यकर्त्यांमध्ये एकमत होते. सगळ्यांनी मला एकच गोष्ट सांगितली, ''आम्ही कोणतीही सफाई देत नाही, कारणे देत नाही, आमच्याकडून चूक झाली, बस्स.'' एका बाबतीत मी महाराष्ट्र मंडळाचे कौतुक करते की त्यांनी त्यांच्याकडून कोणावरही दोषारोप करून विषय वाढवला नाही. त्यांचीदेखील काहीतरी बाजू असेल, मात्र त्यांनी ती अधिकृतरीत्या जाहीर केलेली नाही.

माझ्या लेखाचा उद्देश कोणावरही टीका करावी असा नाही. कोणतेही संमेलन अशा कारणाने गाजू नये हे तर खरेच. परंतु दुबईच्या महाराष्ट्र मंडळाची भूमिका कळली असती तर सर्वांगाने या विषयावर चर्चा होऊन भविष्यात असे कटू प्रसंग कदाचित टाळता आले असते.

पहिल्या दिवशी नांदी झाली नाही, यामध्ये महाराष्ट्र मंडळ, कौतिकराव ठालेपाटील आणि मी असे तिघे संबंधित. यापैकी मी माझी भूमिका या लेखातून मांडते आहे. त्या दोघांनी त्यांची बाजू मांडलीच नाही. मात्र बाकी अनेकांनी त्या प्रसंगाचे त्यांच्या परीने वर्णनही केले आणि आपापल्या परीने विश्लेषणही केले. मात्र लिहिणारे कोणीही प्रसंगाचे प्रत्यक्ष साक्षी नव्हतेच. म्हणूनच ४ मार्च रोजी तिथे काय घडले हे मी सविस्तर सांगायलाच हवे. आता मी तटस्थपणे काही गोष्टी सांगितल्या तर कदाचित पुढचे संमेलन अधिक निर्विघ्न होऊ शकेल, याच विषयावर परत वाद नक्की रंगणार नाही अशी आशा आहे.

विश्व साहित्य संमेलन, दुबई यांच्या वेबसाईटवर जेव्हापासून माझा कार्यक्रम पहिल्या दिवशी शेवटचा आहे असे दिसायला

लागले तेव्हापासून मी महाराष्ट्र मंडळाला वारंवार सांगत होते की, ''तुम्ही मला ४ मार्चला नांदी करण्यासाठी बोलावले आहे. नांदी शेवटी होऊच शकत नाही. नांदीने कार्यक्रमाची सुरुवात असते, नांदी पहिलाच कार्यक्रम असतो.'' मी प्रत्येक वेळी 'पहिलाच'च्या 'च' वर असा जोर देत होते की दुबईचे विनायक देशपांडे मला हसून म्हणाले होते, ''तुमचे सगळेच म्हणणे सगळ्या'च' सकट मी पोहोचवत आहे. काळजी करू नका.''

दुबईच्या विमानतळावरून बाहेर आल्याबरोबर विनायक देशपांडे माझ्यासमोर आले. माझा पहिला प्रश्न होता, ''नांदीचे काय?'' हॉटेलच्या रूममध्ये सामान टाकून १० मिनिटांत मी रिहर्सलला निघाले. कारण ६ मार्चसाठी मला स्थानिक कलाकार ऋतुजा हिला तयार करायचे होते. त्या १० मिनिटांत दातार मला हॉटेलवर भेटले तेव्हाही आम्ही याच विषयावर बोललो. रिहर्सल ३ वाजता संपताच अध्यक्षा संजीवनी पाटील यांच्याशी मी फोनवर बोलले. त्यांनी कौतिकरावांचा फोन नंबर दिला. त्यांच्याशी फोनवर संपर्क होऊ शकला नाही. परत अध्यक्षांशी बोलले. मी सर्वांना एकच गोष्ट वारंवार सांगत होते, ''नांदीने सुरुवातच झाली पाहिजे. नांदी शेवटी झाली तर आज अनेक पत्रकार, साहित्यिक, रसिक हजर आहेत. त्यांच्यादेखत तुमचं आणि माझं देखील हसं होईल, खूप टीका होईल.''

अध्यक्षांनी मला सांगितले, ''तुम्ही लवकरात लवकर सभागृहात या. मग आपण बघुया काय करायचे ते.'' कार्यक्रम साडेसहा वाजता सुरू होणार आणि आरंभ नांदीने करायचा तर माझी तयारी नाही असे व्हायला नको, म्हणून मी रिहर्सल नंतर घाईने चार घास कोंबून हॉटेलवरून जीवाच्या आकांताने हॉलवर पोचले. हॉलवर कार्यकर्ते कार्यक्रमाच्या शेवटच्या क्षणी जशी गडबड असते तसेच गुंतले होते. अध्यक्षा आणि महत्त्वाचे कार्यकर्ते यांना मी स्वत: भेटले, त्यांनी मला सांगितले ,''आता शेवटच्या

**संमेलनाच्या तिसऱ्या दिवशी तीनही नृत्यप्रकार सादर करण्याची संधी मला स्थानिक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. या तीनही दिवसांत दातार दांपत्य माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. या बाबीचा आवर्जून उल्लेख करायला हवा. तिसऱ्या दिवशी संजीवनी पाटील, धनंजय दातार आणि इतर काही पदाधिकारी माझ्या हॉटेलच्या रूमवर आले आणि झाल्या प्रकाराबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. नंतर आम्ही लगेच कार्यक्रमासाठी गेलो.**

क्षणी आपण कार्यक्रमात अजिबात बदल करू शकत नाही आणि हे नाट्यसंमेलन नाही तर साहित्यसंमेलन आहे. त्यामुळे नांदीने आपण कार्यक्रमाची सुरुवात करायला पाहिजे असे नाही. आपण नांदी फक्त नृत्याचा एक कार्यक्रम म्हणून सादर करू!''

मी त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला की लोकांना, रसिकांना 'पंचतुण्ड नररुण्ड मालधर' ही नांदी आहे हे माहीत आहे. आपण असे करू शकणार नाही. मी शेवटी नांदी करणार नाही. त्याऐवजी तिसऱ्या दिवशीचा तराणा मी करीन. यावर ते कसेबसे तयार झाले. तराण्याची ऑडियो मी त्यांच्याकडे देऊन अतिशय खट्टू मनाने मेकअपला बसले. साधारण ७.३० वाजता मी पूर्ण तयार झाले. आता कोणत्याही क्षणी मंचावर जाता येईल, एवढी माझी तयारी झाली होती. मला वेळ दिली होती साधारण ८.३०-९.००ची. दुबई मुंबईच्या अडीच तास मागे आहे. हा फरक लक्षात घेतला तर माझी झोपेची वेळ झाली होती. खुर्चीवर बसले की झोप येत होती म्हणून मी सतत उभी राहून रियाज करत होते. कारण झोप येते तेव्हा शरीरही आळसावते आणि चांगले नृत्य होऊ शकत नाही. असे होणे तर माझ्याकडून कदापि शक्य नाही. नृत्यावर माझी निष्ठा आहे त्यामुळे कोणाला मला तसे कारणही सांगायला आवडले नसते. म्हणून मी सतत रियाज करत होते. रात्री अकरा-साडेअकरा वाजता ''तुमचा कार्यक्रम आहे. चला... चला.... चला'' म्हणून मला बोलवायला आले. मी मनातल्या मनात देवाला नमस्कार करून रंगमंचाच्या डाव्या विंगेत उभी राहिले. वॉकिटॉकीवरून एका कार्यकर्त्याने वर शिडी लावायची सूचना केली. मात्र स्टेजवरून खुर्च्या हलवतानाच निवेदक भाऊ मराठे यांनी ''पुढचा रंजना फडके यांचा नृत्याचा कार्यक्रम उद्या होईल, आज होणार नाही,''असे जाहीर केले!

आता देखील, या वाक्यापुढे लिहिताना माझी लेखणी थांबली आहे. त्याक्षणी माझा श्वास क्षणभर कोंडला. त्यावेळी माझ्या ठिकाणी माझा शत्रू असता तरी त्याच्याबद्दलही मला वाईट वाटले असते. एवढ्या दिवसांनंतरसुद्धा माझे मन संतापाने, दु:खाने उचंबळून आले आहे. त्या ठिकाणी कोणत्याही कलावंताची जी प्रतिक्रिया झाली असती तीच माझी झाली. कलाकारसुद्धा माणूसच असतो! किंबहुना, त्याच्या कलाजाणिवा सामान्य माणसापेक्षा अधिक प्रखर असतात. मला तो प्रचंड अपमान वाटला. संतापाने माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहायला लागल्या. कोणत्याही कार्यकर्त्याच्या अथवा अध्यक्षांच्याही समजावण्याने माझा संताप कमी झाला नाही. संतापाच्या भरात मी त्यांना म्हणत होते,''मला या संमेलनात नृत्य करायचेच नाही. मी गेल्या पंधरा दिवसांपासून नांदी सुरुवातीला ठेवा हे सांगण्याचा आटापिटा केला, पण तुम्ही माझा असा अपमान केलात.''

एक गोष्ट नक्की. त्यांना माझा कार्यक्रम नको होता म्हणून मुद्दाम ते असे वागले असे मला तेव्हाही वाटले नाही आणि आजही वाटत नाही. मी मेकअप उतरवून, न जेवता, कोणालाही न भेटता हॉटेलवर जाऊन रूममध्ये झोपले. झोप रात्रभर लागली नाहीच, शिवाय तेव्हा मी इतकी अपमानित आणि संतापित झाले होते की कोणालाही

तोंड देण्याची माझी ताकद नव्हती. एक गोष्ट सांगायला हवीच की पहिल्या दिवशी माझा कार्यक्रम झाला नाही. मात्र तेव्हा प्रेक्षागृहात अवघी १५-२० माणसे होती. कारण भाषणांनी कार्यक्रम खूप लांबला होता. कविवर्य मंगेश पांडगावकरांच्या मुलाखतीला एवढेच श्रोते शेवटी उरले होते.

अशा प्रसंगाने मुळीच विचलित न होता दुसऱ्या दिवशी कार्यक्रम सादर करणे ही मानसिकता संतांचीच असू शकते. मी एक कलाकार आहे, संत नाही. ज्या कलेसाठी मी माझे आयुष्य, माझ्या आयुष्याचा प्रत्येक क्षण वेचते आहे, त्या नृत्यावर माझी जेवढी निष्ठा आहे तेवढाच मला त्याचा अभिमान आहे. मग कोणी याला माझा 'ईगो' म्हणो अथवा आत्मप्रतिष्ठा. माझ्या कामावर म्हणजेच नृत्यावर माझी पूर्ण निष्ठा आहे, श्रद्धा आहे. केवळ मनोरंजन म्हणून मी माझ्या कामाकडे बघू शकत नाही. एक अभ्यास म्हणून बघते. शास्त्रीय नृत्य, गायन हे अत्यंत शिस्तबद्ध असते हेच संस्कार आमच्यावर आमच्या गुरुजनांनी केले आहेत. असे संस्कार असलेले जगातले सगळेच कलाकार असे प्रसंग हा आपला अपमान समजतात. कारण दुबईत मी केवळ एक व्यक्ती रंजना फडके म्हणून नव्हे, तर कलाकार रंजना फडके म्हणून गेले होते. आज जे माझ्या बाबतीत घडले तसे भविष्यात कोणत्याही कलाकाराबाबत, कोणत्याही व्यक्तीबद्दल घडू नये असा व्यापक दृष्टिकोन ठेवूनच केला हा लेखप्रपंच!

**- रंजना फडके**
फ्लॅट नं. ४९, मयुरेश,
कांजूर सोसायटी, भांडूप (पू.),
मुंबई - ४०००४२
भ्रमणध्वनी - ९८९२१ २९३९१
E-mail : ranjanaphadke@yahoo.co.uk
website : www. ranjanaphadke.com

# लोकशाहीप्रेमी नेता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीचे खरे महत्त्व जणले होते. त्यांच्यामुळे भारतीय जनतेच्या कल्याणाच्या अनेक महत्वाच्या घटना घडल्या. नुकतेच महिलांसाठी ३३% आरक्षणाचे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले. परंतु डॉ. बाबासाहेबांनी ते कायदे मंत्री असताना हिन्दू कोड बिल पंडित नेहरू सरकारपुढे ठेवले होते. त्यामागे त्यांची भूमिका अशी होती की लोकशाही सक्षम बनवण्यासाठी देशातील महिला शिक्षणासह इतर क्षेत्रांतही पुढे आल्या पाहिजेत. ते विधेयक नेहरू सरकारने फेटाळले.

लोकशाहीत जनतेचा आवाज महत्त्वाचा असतो. लोकशाहीत सरकारला जनतेच्या आवाजाकडे लक्ष द्यावेच लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या मतानुसार जनतेच्या हितासाठी संसदीय लोकशाही प्रणाली फार महत्वाची आहे. भारतीय जनतेचे कल्याण संसदीय लोकशाही प्रणालीनेच होऊ शकते असे त्यांचे ठाम मत बनले.

डॉ. आंबेडकर यांनी राज्यसभेत २६ ऑगस्ट १९५४ रोजी पंडित नेहरू यांच्या परराष्ट्रीय धोरणावर कठोर टीका करणारे भाषण केले होते. पंडित नेहरू यांनी आपल्या परराष्ट्रीय धोरणात तीन मुद्दे मांडले होते. शांतता, साम्यवाद व स्वतंत्र लोकशाही यांचे सहअस्तित्व, सीटोला विरोध.

त्या तिन्ही तत्त्वांवर डॉ. आंबेडकर यांनी वास्तववादी टीका केली. साम्यवाद व स्वतंत्र लोकशाही यांच्यात सहअस्तित्व या तत्त्वावर टीका करताना डॉ. आंबेडकर म्हणाले, ''प्रश्न असा आहे, साम्यवाद व स्वतंत्र लोकशाही एकत्र कार्य करू शकतील? ते एकत्र राहू शकतील? यांच्यामध्ये संघर्ष होणार नाही अशी आपण आशा करू शकू? हा सिद्धांत हास्यास्पद दिसतो आहे कारण, साम्यवाद जंगल जाळणाऱ्या (खापऱ्या) अग्नीसारखा आहे. तो अग्नी जळत जात आहे. त्याच्या मार्गात येणारे सर्व काही जाळत जातो.''

त्यांना साम्यवादाविषयी असे का वाटत होते? त्यांनी २० नोव्हेंबर १९५६ रोजी काठमांडू येथे केलेल्या भाषणात बौद्धधर्म व साम्यवाद या विषयावर भाषण देताना महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. कम्युनिस्टांना मान्य असणारी कामगाराची हुकूमशाही धोकादायक आहे. मुळात कोणतीही हुकूमशाही धोकादायकच असते. कामगाराच्या हुकूमशाहीचा शेवट काय? या प्रश्नाचे उत्तर साम्यवादाकडून मिळत नाही. खाजगी मालमत्ता राज्याची मालमत्ता करण्यासाठी हिंसेचा व हत्येचाही आधार घेताना बळाचा वापर करणे हे कामगारांच्या हुकूमशाहीला मान्य असते. म्हणून हा प्रश्न निर्माण होतो. कामगाराची हुकूमशाही अयशस्वी झाली तर काय घडेल? अशी परिस्थिती कम्युनिस्ट रशियात निर्माण झाली तर तेथे काय घडेल? या प्रश्नाचे उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणाले, ''मला जे दिसते त्याप्रमाणे रशियन लोक राज्याची मालमत्ता बळकावण्यासाठी आपआपसांत रक्तपात करीत राहतील असे वाटते.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भविष्यवाणी जवळ जवळ ३५ वर्षांनी २५ डिसेंबर १९९१ रोजी तंतोतंत खरी ठरली. त्या दिवशी रशियातील कामगारांची हुकूमशाही म्हणजे साम्यवादी पक्षाची एकपक्षी हुकूमशाही कोलमडून पडली आणि अराजकता निर्माण झाली. रशियाच्या ताब्यात असलेले अनेक देश स्वतंत्र झाले. अजूनही चेचेन्यासारखे काही देश स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र बनवण्यासाठी युद्ध सदृश्य कृती करीत आहेत. अलिकडे रशियात संसदीय लोकशाही पद्धतीने निवडणूक होत आहेत आणि बहुमताने निवडून आलेला पक्ष सरकार बनवित आहे. याचा अर्थ असा की अखेर रशियाला सुद्धा संसदीय लोकशाही प्रणाली श्रेयस्कार वाटली कारण त्याशिवाय रशियाला तरणोपाय नव्हता.

असा द्रष्टा महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना ११९व्या जयंती-निमित्त निळा सलाम!

**- सुधाकर राऊत**,आगारवाडी

# गोड गोड जुन्या थापा...!

## अरविंद गोखले

पुण्याचे साहित्य संमेलन हा राजकारण्यांचा आखाडा बनायची शक्यता वाटल्यानेच क्रिकेटचा शहनेशहा सचिन तेंडुलकरने त्याकडे पाठ फिरवली. त्याने संमेलनाच्या संयोजकांना आपण येत आहोत असे कळवले नाही आणि येणार नाही असेही सांगितले नाही. त्याच्या या क्रिकेटबाह्य हुशारीला दाद द्यावी तेवढी थोडीच. अभिनयाचा शहनेशहा अमिताभ बच्चन याने आपण संमेलनास उपस्थित राहू असे कळवले आणि तो आलासुद्धा. तो आला आणि त्याने राजकारणात आपल्याशिवाय दुसरे कुणी असू शकत नाही असे मानणाऱ्यांची पळता भुई थोडी अशी अवस्था करून टाकली. मुख्यमंत्रीपदावर असणारी व्यक्ती किती कणाहीन असू शकते हे जनतेला पाहायला मिळाले. अशोक चव्हाण मुंबईत वांद्रे-वरळी सेतुच्या उद्घाटनप्रसंगी बच्चनसमवेत व्यासपीठावर बसले, पण तो त्यांचा नाइलाज होता, असे त्यांच्या जवळच्या मंडळींचे म्हणणे पडले. कारण हे निमंत्रण बच्चनला राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आले होते, असे याच निकटवर्तीयांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्रीपदावर आपण आहोत आणि राज्यशकट हाकणारे आहेत. राष्ट्रवादीचे सगेसोयरे, असे अशोक चव्हाण यांनीच मान्य केल्यासारखी ही अवस्था आहे. बच्चनसमवेत चव्हाण खुर्चीला खुर्ची लावून बसतात म्हणजे काय, असे दिल्लीतून डोळे वटारून विचारण्यात आल्याने प्रश्न निर्माण झाला तो अशोक चव्हाण हे साहित्य संमेलनाच्या समारोप समारंभास अमिताभच्या बरोबरीने हजर राहणार की नाही? अशोक चव्हाणांनी आपण डावपेचात किती निष्णात आहोत, असे दाखवायच्या मिषाने आदल्याच दिवशी संमेलनास हजेरी लावून चालू असणाऱ्या परिसंवादाची मोडतोड करणे आयोजकांना भाग पाडले. बारामतीला जायच्या निमित्ताने पुण्यात आलोच होतो तर म्हटले की संमेलनाला आताच उपस्थित राहून साहित्यिकांशी हितगुज करावे, ही बाब चव्हाणांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केली. थोडक्यात काय तर अमिताभबरोबर त्यांना संमेलनास उपस्थित राहायचे नव्हते. कारण उघड होते. तरीही पत्रकारांनी आपण काय विचारतो आहोत, याचे भान न ठेवता त्यांना विचारलेच, की मग तुम्ही उद्या समारोपाला हजर राहणार ना? चव्हाणांची लबाडी अशी की त्यांनी समारोपाला अजून तब्बल चोवीस तास अवकाश आहे, तेव्हा आताच कशाला त्याविषयी बोलू, असे सांगून त्यांनी पुण्यातून अक्षरश: पळ काढला.

कदाचित यामुळेच असेल, अमिताभने आपल्या कवितावाचनाच्या कार्यक्रमात 'भारत के साँप' ही कविता निवडली असावी. या कवितेला पुणेकरांनी उत्तम दाद दिली. ही कविता अशी,

'भारत के साँपोंके ऊपर पुस्तक एक प्रकाशित है, और बहुतसे लोग खपा हैं
भारत की गरीब जनता तक कैसे ये पुस्तक पहुँचेगी
भारत की नंगी भूखी जनता के आगे
खडी समस्या जितनी हैं
उनमें क्यूं नही प्राथमिकता इसी को
की वो साँपोंका ज्ञान बढाएँ
सहमत उनसे किंतू नही मैं
भारत के इतिहास, धर्म, संस्कृती के पिछे
साँपोंने भूमिका अदा की हैं
जो किसीसे छुपी नही हैं
ज्ञान मिले साँपोंका
कितनीही कीमतपर वो कम हैं
अ से ज्ञ तक पूरी पुस्तक पढ ली मैंने
और मेरी शिकायत
कहने का अधिकार आपको गलत, सही हैं
पुस्तकभर में भारत के सबसे ज्यादा
जहरिले साँपों का कोई भी जिक्र नही हैं'

भारतातल्या सर्वांत विषारी सापांचा पुस्तकात उल्लेख नाही म्हणून चिंतेत असणाऱ्या कविमनाला सापांनी भारतभर अदा केलेल्या भूमिकेचेही कौतुक आहे.

आता प्रश्न असा उपस्थित होतो, की अमिताभला बोलवायची संमेलनाच्या संयोजकांना आवश्यकता का वाटली? डॉ. सतीश देसाई यांचे म्हणणे असे, की संमेलनाला तरुणवर्गाने जास्तीत जास्त यावे म्हणून आम्ही अमिताभला पाचारण केले. हा त्यांना अपेक्षित असणारा तरुणवर्ग कसा होता ते संमेलनाने अनुभवले आहे. अमिताभने बोलावे आणि कवितांचे वाचन करावे म्हणून हा वर्ग इतका अधीर झाला होता, की त्याने संमेलनाध्यक्षांच्याही भाषणात अडथळे आणले. त्यांच्यापेक्षाही जास्त हसे कौतिकराव ठालेपाटील यांनी करून घेतले. त्यांनी टाळ्याशिट्ट्यांनी न जुमानता आपले भाषण सुरू ठेवले, पण त्यांच्या या आडमुठेपणाला सतीश देसाईंच्या या तरुण श्रोत्यांनी अजिबात भीक घातली नाही. अमिताभना चांगले मराठी येते, ते उत्तम मराठी बोलतात, असे अमिताभ यांच्यासमोर सांगण्यात आले, पण प्रत्यक्षात अमिताभ यांचे मराठी म्हणजे 'हिंम्राठी' असल्याचे लक्षात आले. गंमत अशी की अमिताभच्या शब्दासाठी आसुसलेल्या पुणेकरांना तेही मराठी चालले, पण संमेलनातले मराठी नको, असे त्यांचे मत असावे. मुळात संमेलन कशासाठी होते, त्यामागचा नेमका हेतू काय होता, असा प्रश्न पडावा इतके ते सुमार दर्जाचे झाले. डॉ. द.भि. कुलकर्णी अध्यक्ष असणाऱ्या संमेलनात यापेक्षा जास्त काही घडेल अशी अपेक्षा ठेवणेच चुकीचे ठरणारे

होते. दभिंनी समारोपाचे भाषण करताना तर अमिताभची उपस्थिती का आहे आणि समोर हजर असणारे सर्वजण हे काही केवळ अमिताभसाठी आलेले नाहीत हे सांगण्यात बराच वेळ दवडला आणि तुम्ही टाळ्या वाजवल्या तरी मी थांबायचे तेव्हा थांबेन हे सांगूनच ते थांबले. एकूणच बेताच्या भाषणबाजीला अचानक खीळ बसली आणि अखेर अमिताभच्या हातात सूत्रे आली. या सर्व अखेरच्या सत्रात खरी बाजी अमिताभने मारली तशी ती सुधीर गाडगीळ यांनीही मारली. गाडगीळांनी कुठेही रंगाचा बेरंग होऊ दिला नाही.

नको त्या गोष्टीला विनाकारण महत्त्व प्राप्त झाल्याने संमेलन राहिले बाजूलाच आणि चर्चा मात्र होत राहिली ती अमिताभ आणि चव्हाण यांच्या वादाची. राष्ट्रवादीवाले मात्र काँग्रेस पक्षाला खेळवत राहिले. शेवटच्या दिवशी आपण संमेलनाला हजर राहणार आहोत, असे सांगलीमध्ये गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी हेतूत: जाहीर केले होते, पण कदाचित त्या संमेलनास त्यांच्या सांगली जिल्ह्याचेच मंत्री जयंत पाटील हजर राहणार असल्याचे कळल्याने असेल, ते संमेलनाकडे फिरकले नाहीत. या सर्व संमेलनाच्या निमित्ताने अमिताभविषयी जे वादळ निष्कारण उठवले गेले त्याने अमिताभचे नुकसान तर काडीमात्र झाले नाही, उलट काँग्रेसवाले किती मूर्ख आहेत, हे स्पष्ट झाले. संमेलनाच्या संयोजकांनाच जर आपल्या हाताने आपले नुकसान करायची अवदसा आठवली असेल, तर त्याला कोण काय करणार?

संमेलनाच्या आदल्या दिवसापासून संमेलनाचे काय वांगे होणार ते पुणेकरांना कळून चुकले होते. त्या दिवशी पुणे शहरातून महत्त्वाच्या रस्त्याने ग्रंथदिंडी काढण्यात आली. म्हाताऱ्या साहित्यिकांनी आपल्याला उन्हाची झळ लागेल म्हणून की काय, या ग्रंथदिंडीकडे पाठ फिरवली होती. तीन बग्ग्यांमध्ये कोण होते, तर वि.भा. देशपांडे, माधवी वैद्य हे साहित्यिक म्हणता येतील असे चेहरे आणि श्रीनिवास पाटील, प्रकाश जावडेकर आणि पुण्याचे महापौर मोहनसिंग राजपाल. या ग्रंथदिंडीत बाकी सारे होते ते राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसचे निवडक चेहरे. बाकी शाळांमधील मुले-मुली आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष सतीश देसाई. त्यांच्या उत्साहाला अजिबात तोड नव्हती हे खरे असले तरी त्यांनी कुणाला बोलवावे कुणाला नाही, याविषयी जरा सूज्ञ मंडळींचा सल्ला घ्यायला हरकत नव्हती. असो, संमेलन पार पडल्यानंतर त्या संमेलनाच्या संयोजकांना झोडपण्यात काय अर्थ आहे? संमेलनाच्या पहिल्या दिवशी माजी संमेलनाध्यक्षांचा सत्कार उरकण्यात आला, त्यावेळी व्यासपीठासमोर बसलेले डॉ. आनंद यादव यांना व्यासपीठावर बोलवायचे भानही संमेलनवाल्यांनी दाखवले नाही. डॉ. यादव हे अध्यक्षपद भूषवू शकले नाहीत. महाबळेश्वरला जे काही घडले ते योग्य नव्हते, पण म्हणून त्यांना वाळीत टाकणे योग्य नव्हते. त्यांचा सत्कार जाहीर होताच संमेलनात टाळ्यांचा कडकडाट झाल्याने डॉ. यादवांविषयी साहित्यप्रेमींना काय वाटते ते दिसून आले.

संमेलनाच्या पहिल्या दिवशी ना.धों. महानोरांनी सरकारला धारेवर धरले, पण ते नाटक वाटावे इतके विचित्र होते. त्यांच्यासारख्या ज्येष्ठ कवीला अजित पवारांकडे पाहून आणि बऱ्याचदा त्यांना उद्देशून का बोलावे लागले ते मात्र कळत नाही. त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक धोरणावर बोचरी टीका केली, पण त्यांच्या भाषणालाही सूर सापडला नाही. त्यांचे भाषण दाखवणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वाहिन्यांनी त्यांचे भाषण होईपर्यंत एकदाही विश्राम घेतला नाही, पण दभिंचे भाषण सुरू झाले आणि त्यांच्या भाषणाचा एकूण वकूब लक्षात घेऊन की काय, त्यांनी या भाषणाला मध्येच विराम दिला. त्यांचे भाषण आपण मध्येच का थांबवले आणि ते आपण पूर्ण कधी दाखवणार आहोत, हे सांगायचेही भान त्यांना राहिले नाही. थोडक्यात त्यांचा हा थकवा शेवटच्या दिवशी त्यांनी दूर केला. तेव्हा मात्र त्यांनी 'तो आला, त्याने पाहिले आणि त्याने जिंकले', या चालीवर संमेलनाची ही कथा अमिताभवाणीने सुफल संपूर्ण केली. एकूण काय तर संमेलन उरकले हेच खरे. गणेशोत्सवाच्या शेवटी आपण गणपतीबाप्पांना 'पुढल्या वर्षी लवकर या', असे म्हणतो. पण साहित्य संमेलनाला मात्र आपण तसे म्हणायचे धाडस करत नाही. कारण सांगणे न लगे. बाकी संमेलनात पुण्याला शोभेल असे जेवण, त्यासाठी शोभेल अशी गर्दी होती. पुस्तकांची विक्रीही चांगली झाली, एवढा फायदा उत्तम. बाकी संमेलनात होते काय, तेच ते! कोणत्याच परिसंवादात दम नव्हता. तमाम महाराष्ट्रातून आलेल्या कवींनी आपली हौस भागवून घेतली आणि ज्यांना ती भागवता आली नाही त्यांनी आपल्यावर घोर अन्याय झाल्याचे जाहीर केले, हेही नेहमीचेच. विंदानगरीत पार पडलेल्या या साहित्य संमेलनाविषयी विंदांच्याच शब्दात सांगायचे तर,

जितकी डोकी तितकी मते  
जितकी शिते तितकी भुते;  
कोणी सफेद, कोणी लाल;  
कोणी लठ्ठ; कोणी मठ्ठ;  
कोणी ढिले, कोणी घट्ट;  
कोणी कच्चे, कोणी पक्के  
सब घोडे बारा टक्के!  
गोड गोड जुन्या थापा;  
(तुम्ही पेरा, तुम्ही कापा)  
जुन्या आशा, नवा चंग;  
जुनी स्वप्ने, नवा भंग;  
तुम्ही तरी करणार काय;  
आम्ही तरी करणार काय;  
त्याच त्याच खड्ड्यामध्ये  
पुन्हा पुन्हा तोच पाय  
जुना माल, नवे शिक्के;  
सब् घोडे बारा टक्के!

ही कविता १९५२ मध्ये विंदांनी लिहिली तेव्हाच त्यांचे द्रष्टेपण सिद्ध झाले होते.

---

**अरविंद व्यं. गोखले**  
arvindgokhale@gmail.com

# ग्रंथांचा सहवास

## वि.शं. चौघुले

ग्रंथांचा सहवास कधीपासून घडला याचा विचार करू लागलो की ६०-६५ वर्षांपूर्वीचे दिवस आठवतात. माझा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील विशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या छोट्या खेड्यात झाला. तिथं प्राथमिक शाळा नुकतीच सुरू झाली होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस माझे आजोबा कोकणातून मुंबईत आले. डॉकयार्ड स्टेशनजवळ एका बैठ्या चाळीत त्यांनी विडी-तंबाखूचं दुकान उभं केलं. त्यांच्या पश्चात माझे वडील दुकान चालवीत. दुकानाच्या मागे आम्ही राहत होतो. आजोबांना सही करण्यापुरती 'राघोबाबाजी' ही पाच अक्षरं लिहिता येत. वडील त्यावेळच्या चार इयत्तापर्यंत शिकले होते. त्यांना संतवाङ्मयाची आवड होती. ते धार्मिक वृत्तीचे सदाचरणी प्रापंचिक होते. त्यांच्या दैनंदिन पूजेतील पठणात शिवलीलामृताचा अकराव्या अध्यायाच समावेश असे. श्रावण महिन्यात 'रामविजय', 'पांडवप्रताप' या पोथ्यांचं वाचन केलं जात असे. आर्थिक परिस्थिती बरी असलेल्या समाधानी कुटुंबात माझी घडण झाली. मोठा भाऊ नबाब टँक मैदानावर भरणाऱ्या राष्ट्र सेवादलाच्या शाखेत जात असे. माझी मावशी कमल रेडीज ही प्रमिला करंडेची (नंतर दंडवते) मैत्रिण. तिच्या मैत्रीमुळे मावशीही राष्ट्र सेवादलाच्या ग्रँट रोडच्या शाखेत जाऊ लागली. मोठ्या भावाला आणि मावशीला वाचनाची आवड होती. ''पण लक्षात कोण घेतो?'' ही कादंबरी माझ्या आजीला क्रमश: वाचून दाखवल्याचं मावशी सांगत असे. पुढे ती ताडदेवच्या 'युसुफ मेहेरअली' हायस्कूलची मुख्याध्यापिका म्हणून निवृत्त झाली.

तिसऱ्या इयत्तेपर्यंत डॉकयार्डला महापालिकेच्या प्राथमिक शाळेत मी जात असे. एके दिवशी वडिलांनी माझ्यासाठी बिरबल आणि बादशहाच्या विनोदी गोष्टींचं पुस्तक आणलं. अडखळत वाचलेलं ते पहिलं पुस्तक. स्वातंत्र्यपूर्व काळात डॉकयार्ड - माझगाव भागात धार्मिक दंगली सुरू झाल्या. एकदा रात्री आमच्या दुकानावर अचानक हल्ला झाला. आम्ही शेजारच्या मुस्लिम कुटुंबांमध्ये रात्रभर राहिलो. नंतर गिरगावात राहायला आलो. गिरगावातलं त्यावेळचं सांस्कृतिक वातावरण उभारी देणारं होतं. भाई जीवनजी लेनमधील ग्रंथालयातून भाऊ पुस्तकं घेऊन येई. मॅट्रिक झाल्यावर तो वडिलांना व्यवसायात मदत करू लागला, पण त्याचं पुस्तकाचं वेड कायम राहिलं. 'श्यामची आई' हे पुस्तक त्यानं मला दिलं. आईचे काका म्हणजे माझे आजोबा सी.पी. टँकला राहात. त्यांना क्रिकेटचे सामने आणि मराठी नाटकं पाहण्याचा शौक होता. बॉबी तल्यारखान त्यांचा आवडता कॉमेंटेटर. कधीकधी माधवबागेतील 'तुकाराम पुंडलिक बुकडेपो'मध्ये आजोबा मला नेत. दुकानातील कपाटांत व्यापाऱ्यांच्या हिशोबाच्या चोपड्या, खतावण्या आणि धार्मिक पुस्तकं ठेवलेली असत. 'सिंदबादच्या सात सफरी', 'रामायण महाभारतातील बोधपर गोष्टी', 'सानेगुरुजींच्या गोड गोष्टी', 'इसापनीती' अशा पुस्तकांचा गठ्ठा आजोबा माझ्या समोर ठेवत. सानेगुरुजींची 'अश्रूंचे तळे' गोष्ट वाचताना मी गलबलून गेलो होतो.

गिरगावातली सेंट्रल सिनेमासमोरची महापालिकेची प्राथमिक शाळा, आर्यन हायस्कूल आणि सिद्धार्थ कॉलेजमध्ये माझं शिक्षण झालं. भालचंद्र वैद्य हे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मुलांच्या कलागुणांना वाव देणारे आदर्श शिक्षक होतो. लहान मुलांसाठी त्यांनी लोकमान्य टिळकांचं चरित्र, नंदीची गोष्ट, वाघाची मावशी ही पुस्तकं लिहिली. महापालिकेच्या शाळेत मोठं सभागृह नव्हतं. म्हणून वैद्यगुरुजी आर्यन हायस्कूलमध्ये मुलांचे करमणुकीचे कार्यक्रम सादर करीत. आर्यन हायस्कूलमध्ये त्यावेळी कृष्णाष्टमीच्या निमित्तानं सांस्कृतिक कार्यक्रम होत. ग्रंथालयातून आठवडाभरासाठी पुस्तकं मिळत. एखादा तास होणार नसेल तर शिपाई पुस्तकांची पेटी घेऊन वर्गात येई. छत्रपती शिवाजी महाराज, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, राणा प्रताप इत्यादींच्या छोट्या पुस्तकांतील साहसकथा चाळता येत. वि.रा.वैद्य, प्र.सी. जोगळेकर, ए.आर.देसाई हे साहित्यप्रेमी शिक्षक शाळेत होते. ज्यांच्या गोड गोष्टी आधी वाचल्या होत्या त्या सानेगुरुजींना आणि गो.नी. दांडेकरांना शाळेत व्याख्यानासाठी बोलावलं होतं. वैद्यसर 'आर्य' मासिकाचं संपादन करीत. 'मौज'मध्ये छापलेल्या छोटेखानी अंकात विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख, गोष्टी, चुटके, कविता, स्पर्धेत बक्षिसे मिळालेले निबंध इत्यादींचा समावेश असे.

जाहिराततज्ज्ञ भरत दाभोळकर मुलाखतीत व व्याख्यानात आर्यन हायस्कूल-मध्ये मराठी माध्यमातून शिकल्याचा आवर्जून उल्लेख करतात. सिद्धार्थ कॉलेजमधील बी.ए.पर्यंतची चार वर्षं आणि मुंबई विद्यापीठातील एम्.ए.ची दोन वर्षं हा सहा वर्षांचा काळ म्हणजे मला ग्रंथसहवासाची आनंदपर्वणी होती. सिद्धार्थचे ग्रंथपाल शां.शं. रेगे चोखंदळ वाचक होते. ते प्राध्यापकांना पुस्तकं देत, काही अभ्यासू विद्यार्थ्यांना नियमातील काटेकोरपणा दूर सारून पुस्तकं देत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अफाट

ग्रंथसंग्रहाची पद्धतशीर मांडणी रेग्यांनी केली होती. वसंत सावंत, केशव मेश्राम, श्रीपाद भागवत, कुंदा ओक (माधवी चाफेकर), मृदुला गांगल, रवींद्र पिंगे, रमेशचंद्र पाटकर, वसंत हुबळीकर, एस.एस. नाडकर्णी हे सगळे मित्र केवळ पदवी मिळवणारे विद्यार्थी नव्हते. आपली नोकरी सांभाळून सर्वजण खूप अवांतर वाचन करीत. सिद्धार्थमध्ये गुरुवर्य प्रा. अनंत काणेकर, रमेश तेंडुलकर, विद्याधर पुंडलिक, शांताबाई शेळके, रा.भि. जोशी, यांच्यासारखे प्राध्यापक पुस्तकनिवडीसाठी मदत करीत. ठाकूरद्वारची मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची अभ्यासिका केवळ संदर्भग्रंथ अभ्यासण्याची जागा नव्हती. छोट्याशा जागेत वा.ल. कुलकर्णी, वि.ह. कुलकर्णी या प्राध्यापकांची व्याख्यानं होत.

पुढे संदर्भ विभाग दादरच्या नवीन इमारतीत हलविण्यात आला. लतिका जोशी, मनोहर पारायणे आणि अलिकडे शशिकांत भगत या सर्वांनी आम्हा मुंबईतील प्राध्यापकांनाच नव्हे तर परगावाहून आलेल्या संशोधक अभ्यासकांना तत्परतेनं संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिले. अजूनही अनेक अभ्यासक अशा सेवाभावी साहाय्यकांची आठवण काढतात.

एम्.ए.पर्यंतचं वाचन वैयक्तिक आवड आणि परीक्षेची तयारी एवढ्यापुरतंच मर्यादित होतं. मी १९६२ नंतरची सात वर्षं अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूरच्या बोरावके कॉलेजात आणि चिपळूणच्या डॉ. दातार कॉलेजात, तर अखेरची २५ वर्षं विलेपार्ले येथील महिला विद्यालयात मराठी विषयाचा व्याख्याता म्हणून काम केलं. निवृत्तीनंतरची १२ वर्षं पार्ल्यातच गेली. अध्यापन व्यवसायातल्या माणसाचं भरण-पोषण होतं ते उपलब्ध झालेल्या पुस्तकांमुळे. त्याबाबतीत मी नशीबवान आहे. ज्या कॉलेजांत काम केलं ती नुकतीच सुरू झाली होती. पण कॉलेजातील मर्यादित ग्रंथांच्या वाचनाला जोड मिळाली ती सार्वजनिक ग्रंथालयांची महापालिकेचे वाचनालय (श्रीरामपूर), लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय (चिपळूण), 'लोकमान्य सेवा संघा'चे श्री.वा. फाटक ग्रंथालय आणि विलेपार्ले महिला संघाचं कृष्णाबाई लिमये वाचनालय, एस्.एन्.डी.टी. विद्यापीठाचं ग्रंथालय, 'युसिस' आणि ब्रिटिश कौन्सिल लायब्ररी ह्या सगळ्या ग्रंथालयाचं ऋण मान्य करायलाचं हवं. सदैव नव्या-जुन्या ग्रंथांत बुडालेले डॉ. स.गं. मालशे, श्रीरामपूरचे ग्रंथपाल हरिभाऊ कुलकर्णी आणि चिपळूणचे ग्रंथरसिकमित्र गजानन तथा दादा फडके ही काही प्रातिनिधिक उदाहरणे अशा अनेक सुहृदांचं सहकार्य ग्रंथनिवडीसाठी मिळालं.

महाविद्यालयात मराठीचं अध्यापन करताना वाचनाचं अर्थात ग्रंथनिवडीचं स्वरूप बदललं. बी.ए., एम.ए.च्या वर्गातील व्याख्यानासाठी केलेलं वाचन, स्वतंत्र लेखन-संपादनासाठी केलेलं वाचन आणि स्वत:च्या आवडीखातर केलेलं वाचन हे तीन घटक पुस्तकांच्या निवडीसाठी कारणीभूत झाले. गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत नेहमीच्या अध्यापनाबरोबर व्याख्यानं, सभा-संमेलनं, चर्चा-परिसंवाद-मुलाखती, ग्रंथजत्रा, साहित्यमेळावे, साहित्य संस्थांचे कार्यक्रम, विविध स्पर्धांचं परीक्षण, प्रस्तावनालेखन या माध्यमांतील सहभागामुळे बरंच वाचन झालं. अध्यापन व्यवसायाच्या गरजेतून झालेल्या वाचनाला अनुभवाची जोड मिळाली. जी आस्वादक, परिचयपर आणि समीक्षात्मक पुस्तकांची निर्मिती मी केली. त्यातील काहींना अनुभवाचा आधार होता. ललित गद्याच्या विकासक्रमाचा परामर्श घेताना ललित लेखांनी 'मुक्तगद्य' ही संज्ञा योजली. परीक्षणपर लेख, स्वतंत्र आस्वादक-समीक्षा लेख, आढावे या प्रकारच्या लेखनाला पुस्तकांचा आधार होता, तर मुलाखती या लवचिक अभिव्यक्ती माध्यमावरील 'साहित्य संवाद' व 'संवादचित्रे' या पुस्तकांच्या निमित्तामागे विविध माध्यमांतील अनुभवाचं संचित होतं. गं.बा. सरदार, रघुवीर सामंत, अनंत काणेकर आणि केशवराव कोठावळे यांच्या कार्यकर्तृत्वाचा परामर्श घेताना त्यांचा लाभलेला सहवास, मुलाखती, गाठीभेठी, संदर्भ साधनांचं पाठबळ उपयुक्त ठरलं. मध्ययुगीन संतसाहित्य हा माझ्या अध्यापनाचा विषय असला तरी मी धर्म-तत्त्वज्ञान-संतविचाराचा साक्षेपी अभ्यासक नाही. सभोवतालचे धार्मिक-सामाजिक वास्तव व संतांचे महाराष्ट्रातीलच नव्हे-भारतीय पातळीवरील संतांचे मूलगामी मानवतावादी विचार यांची तुलना अंतर्मनात सुरू झाली. 'मी आणि माझा देव' या संपादनामुळे वाचन झालं. संतसाहित्याविषयी सामाजिक परिप्रेक्ष्यातून लिहावंसं वाटलं. 'संत, समाज आणि अध्यात्म' व 'संतविचार कशासाठी?' ही पुस्तकं आकारास आली. साहित्याचं अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची जवळजवळ हीच प्रक्रिया असावी. माझ्या काही लेखनाला 'ग्रंथसहवासा'बरोबर अनुभवाची-समाजनिरीक्षणाची जोड मिळाली आहे.

साहित्यनिर्मिती मधील गुणवत्तेचं स्वरूप, वाचकांचे सामाजिक स्तर, शासनाचे धोरण, शिक्षणाचं माध्यम, चंगळवादी समाजरचना, माध्यमांचा होणारा परिणाम इत्यादी घटक अपेक्षित चर्चेशी निगडित आहेत. महाराष्ट्रातील प्रस्थापित प्रकाशन संस्थांबरोबर नवी प्रकाशन संस्था उदयास येत आहेत. रंजनपर, माहितीपर, गंभीर, वैचारिक अशी हजारो पुस्तकं प्रकाशित होत आहेत. पण या विषयांवरील बरंचसं लेखन परिचय करुन देणारं, माहितीपर असतं. ग्रंथांना प्रतिसाद देणारा वाचकवर्ग ही एकाच प्रकारचा नाही. त्यांत केवळ वेळ घालवण्यासाठी किंवा रंजन व्हावं म्हणून पुस्तकांच्या वाटेला जाणारे वाचक बहुसंख्येनं आहेत. खरं धार्मिक म्हणण्यापेक्षा चमत्कारप्रधान, बुद्धीपेक्षा भावनेला आवाहन करणारं लेखन वाचकांना आवडतं. व्यवहारोपयोगी, यशस्वी जीवनाचा 'मंत्र' देणारी पुस्तकं वाचणाऱ्या वाचकांची अभिरुची कशी मोजायची? अशी पुस्तकं वर्तमानकालीन समाजाची गरज आहे, त्यांना

चांगली मागणी आहे हे मान्य केलं पाहिजे. मात्र त्यामुळे ग्रंथनिर्मितीचा विकास झाला आहे, असं म्हणता येणार नाही. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, शिक्षणाचं इंग्रजी माध्यम आणि मातृभाषेची सर्व पातळ्यांवर होणारी उपेक्षा. अशा परिस्थितीत मातृ-भाषेपासून, सांस्कृतिक वारशापासून नवी पिढी हळूहळू तुटत जाते. व्यापक पातळीवर विचार केला तर कोणतं चित्र दिसतं? वैश्विक पातळीवर मातृभाषेचा-मराठीचा गौरव आणि स्वत:च्या देशात तिची उपेक्षा असं विपरित -विसंगतीपूर्ण चित्र दिसू लागतं.

ग्रंथालय आणि त्यांचं संवर्धन हे भूतकालीन सांस्कृतिक जीवनाचं वैशिष्ट्य होतं. ज्याप्रमाणे शिक्षणसंस्था ध्येयनिष्ठेनं चालवल्या जात त्याचप्रमाणे ग्रंथालयं आणि एकूणच वाङ्मयीन संस्कृतीचं जतन होत असे. आता मुंबई शहरातील ग्रंथालयं बंद होण्याच्या मार्गावर आहेत. मराठी माध्यमाच्या शाळांची जवळजवळ तीच स्थिती आहे. ग्रंथालयांना मिळणारं अनुदान पुरेसं नाही, पुस्तकं महाग झाल्यामुळे ग्रंथसंग्रह वाढत नाही, तुटपुंज्या वेतनामुळे ग्रंथालयीन सेवकांकडून उत्तम कामाची अपेक्षा करणं उचित नाही. नवीन ग्रंथांचा परिचय करून देणं, मोठी शहरं आणि ग्रामीण परिसरातील लहान ग्रंथालयं, जिल्हा-तालुक्याची शहरं या साखळीतील दुवे नीट जोडले जात नाहीत. मुंबई-पुणे यांसारख्या शहरांतील उपक्रम, महाराष्ट्रातील कोकण-मराठवाडा खानदेश-विदर्भ-पश्चिम महाराष्ट्रातील नवोदित लेखकांची पुस्तकं, तिथला ग्रंथव्यवहार यांतील संपर्क राखण्यासाठी कोणतंही माध्यम उपलब्ध नाही. दोन महिन्यांपूर्वी गडहिंग्लज इथे झालेल्या मराठी विषयावरील चर्चासत्रात गोव्याहून आलेल्या प्राध्यापिकेनं खंत व्यक्त केली की 'गोव्यात प्रसिद्ध होणारी पुस्तकांची, तेथील वाङ्मयीन उपक्रमांची दखल महाराष्ट्रातील जाणकारांकडून घेतली जात नाही.' केवळ गोवाच नाही महाराष्ट्रालगतच्या अन्य भाषिक प्रदेशांत-सीमाप्रदेशात वाङ्मयीन घडामोडींचा परिचय करून देणारं 'समान माध्यम'च अस्तित्वात नाही. ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे. अभिरुचीची जोपासना ही कृत्रिम प्रक्रिया नाही. भविष्यातील सांस्कृतिक विकासाची, वाचनसंस्कृतीची बीजे आजच रोवली पाहिजेत. सर्व पातळ्यांवर राजकारण-समाजकारण-शिक्षण ह्यांतील मान्यवरांनी केलेल्या भाषाविकासांच्या घोषणा आणि संकल्पनांचे उपयोजन यांत बराच भेद आहे. प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन पातळीवरील विद्यार्थ्यांची आस्वादक्षमता वाढावी, उत्तम साहित्य-कृतींकडे त्यांनी आकृष्ट व्हावं, त्यांना भाषिक अस्मिता जोपासावी म्हणून कोणते प्रयत्न केले जात आहेत? या प्रश्नाचं नेमकं आणि होकारात्म उत्तर देता येईल, असं मला वाटत नाही. मात्र याबाबतीत सगळीकडे निराशाच दाटलेली आहे असंही म्हणता येणार नाही. इंटरनेटनं घरबसल्या माहितीचा ढीग उभा केला तरी एखादी गाजलेल्या साहित्यकृतीला किंवा भावकवितेला, काव्यवाचनाला मिळणारा युवकांचा प्रतिसाद दिलासा देणारा आहे. चोखंदळ वाचकांना, विद्यार्थ्यांना ग्रंथनिवडीसाठी साहाय्य करणं, महाविद्यालयाच्या भाषाविभागांनी अन्य भाषा परिचयासाठी कार्यक्रम घडवून आणणं, सर्जनशीलतेची क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिबिरांचं आयोजन करणं, दर्जेदार साहित्यकृतींच्या आस्वाद-आकलन -परामर्शासाठी इच्छुकांना मार्गदर्शन करणं यांतून अभिरुची वाढवणं शक्य आहे.

आनंददायी ग्रंथसहवास ही केवळ वैयक्तिक गरज नसून वाङ्मयीन संस्कृतीच्या विकासासाठी कृतिशील राहणाऱ्या सर्वांची ती जबाबदारी आहे. जबाबदारीच नव्हे तर आव्हानही.

**– वि.शं. चौघुले**

५/ए, ॐ विजयश्री, संत जनाबाई पथ,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.
दूरध्वनी-(०२२)२६१३ ३६६०
भ्रमणध्वनी-(०२२)२०५०२०५०

## मौन होई बोलके

**रोहिणी लिमये**



**मूल्य २०० रुपये;**
**सवलतीत १२० रुपये**

'मूकं करोति वाचालम्' हे आपण ऐकून असतो. मात्र हा केवळ दैवी चमत्कार नसतो. व्यक्ती मुकी का होते आणि तिला बोलते कसे करता येते, यामागे शास्त्र असते; पण त्यापेक्षा असते प्रचंड मेहनत आणि त्यांना माणूस म्हणून दिलेला प्रेमळ आधार. मुंबईत कर्णबधिरांसाठी शाळा काढून रोहिणी लिमये यांनी अनेकांना मुकेपणापासून मुक्ती देऊन व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिली. कर्णबधिरांसाठी शाळा सुरू केली, उपयुक्त अभ्यासक्रम आखले. श्रवण, वाचा व भाषाविष्कारासाठी विविध साधनांची निर्मिती केली. त्यांच्यातला माणूस घडवला. या अथक परिश्रमांचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव झाला. स्वत मूक राहून, आपल्या योगदानातून बोलणाऱ्या ध्यासाची कहाणी म्हणजे 'मौन होई बोलके.'

# पारधी समाजाची परवड : ‘उदई’

## भगवान इंगळे

साधारण गेल्या शतकातल्या साठच्या दशकात दलित आत्मकथन अवतीर्ण झाले. तळागाळातल्या अनेक लेखकांचे दर्जेदार लिखाण गाजले. साहित्यविश्वाला जाग आली. नंतर अनेकांनी आपल्या व्यथावेदना समाजाच्या वेशीवर टांगून मराठी वाङ्मय विश्वाला हादरे दिले. शिक्षणाच्या प्रसाराने जसा चहूबाजूने वेग घेतला, तशा उपेक्षित जाती, आदिवासी, भटक्या जमाती सजग झाल्या. त्यांच्यात जीवन विषयक जाणिवा निर्माण झाल्याने त्यांनी आपले जीवघेणे अनुभव व्यक्त करण्यासाठी आत्मकथनाचा आधार घेतला. अशाच उपेक्षित जमातीतल्या प्रकाश चव्हाणांचे ‘उदई’ हे आत्मकथन ‘ग्रंथाली’ने नुकतेच प्रकाशित केले आहे.

‘उदई’ म्हणजे अन्नधान्याला, लाकडाला लागलेली कीड किंवा वाळवी. अव्यवहारात्मक खुळचट रुढी, प्रथा परंपरेची आपल्या जमातीला लागलेली वाळवी लेखकाने स्वत:च्या जीवनानुभवातून प्रभावीपणे मांडली आहे. गुन्हेगारीच्या शिक्क्याने बदनाम झालेल्या ‘पारधी’ जमातीत जन्मलेले लेखक प्रकाश चव्हाण विदर्भातील अविकसित अमरावती जिल्ह्यातले असल्यामुळे, त्यांचे दु:ख अधिक गहिरे आहे. बोलीभाषा करुणेने ओथंबलेली आहे. तिच्यात उपजत गोडवा आहे. आई-वडिलांना प्रकाश आणि अशोक हे दोन मुलगे, धाकटी मुलगी शिली अशी तीन अपत्ये आहेत. थोरला प्रकाश या कथेचा नायक.

रुढार्थाने नायकाच्या जन्मापासून, त्याच्या गावापासून प्रारंभ होणाऱ्या पारंपरिक आत्मचरित्राची चौकट या लेखकाने मोडली आहे. तो फ्लॅश बॅकने आपले अनुभव कथन करतो. पारधी समाजात पाचवीला पुजलेली, आज्या-पणज्या, बापजाद्यांपासून चालत आलेली, रक्तात भिनलेली कोर्टकचेरीची झंझट, शिक्षण घेऊन नोकरीला लागलेल्या प्रकाशच्याही वाट्याला येते. त्याची पत्नीच खोट्या केसमध्ये नवऱ्यासह आख्ख्या कुटुंबाला गोवते. ते सर्व आरोपी जिल्हा कोर्टात तारखेला हजर होतात. अगोदर




ठरल्याप्रमाणे फिर्यादी बायको केस माघारी घेत असल्याचे न्यायालयात सांगते. कोर्ट आरोपींना गुन्ह्यातून मुक्त करते. नि:श्वास टाकून ‘सुटलो एकदाचे’ म्हणत ते सर्वजण बाहेर पाडतात. वकिलाची फी द्यायला त्यांच्याजवळ खडकू नसतो. वकिल तणतणतो, पारध्यांना दूषणे देतो. जळजळीत शब्दांत उपहासाने बोलतो. लेखक विचार करतो. मनात म्हणतो, ‘‘त्याचे खोटे नाही. बापजाद्यांची जिंदगी पोलिस स्टेशनने खाल्ली. इथवर येऊन मीही त्याच वाटेवर! आपल्या जातीला लागलेली ही उदई आहे, उदई!’’ येथून लेखक आपल्या चार-पाच वर्षापासूनच्या आयुष्यात शिरतो, आपले गत-आयुष्य निर्मळपणे सांगू लागतो, अशी या आत्मकथनाची सुरुवात आहे.

पारधी समाजातल्या कुणाला जिंदगीत शिक्षणाचा झेंडा रोवता आलेला नाही. लेखकाचा बाप रामभाऊ दुसरीतून शाळा सोडून देतो. मोठेपणी देवीचा भगत होतो. तो विचारी आहे, तसा परोपकारी आहे. पारधी पेंढावर कोणी आजारी पडल्यास, त्या बिमाऱ्याची सेवा करायला त्याच्या बरोबर रात्री अपरात्री चार-चार, पाच-पाच दिवस, स्वत:चे कामधाम बुडवून दवाखान्यात राहतो. परंतु जातवाले त्याच्यावर खार खातात. डायरीयाने दवाखान्यात दगावलेला मुलगा राम्यामुळेच मेला म्हणत त्याचे देवीपुढे सुगन (खरे खोटे) करतात. त्याला दोषी ठरवून शिक्षा ठोठावतात. त्यामुळे रामभाऊचा सुगन या रिवाजावरून कायमचा विश्वास उडतो. खऱ्यासाठी बेंबीच्या देठापासून ताव मारणारा, स्केलपट्टी लावून वागणारा रामभाऊ जातवाल्यापासून धान्यातल्या खड्यागत नेहमी अलग पडतो. त्याच्यावर शिक्षणाचा पगडा असल्यामुळे तो शिकलेल्या लहान पोरांनाही आहोजाहो-शिवाय बोलत नाही. प्रकाशचे नाव शाळेत टाकतो. त्यावेळी झालेल्या आनंदाप्रीत्यर्थ दारू पितो. परिस्थितीने आपल्याला नाही जमले पण आपल्या मुलाने शिकावे, या दारुण व्यवस्थेतून बाहेर पडावे, ही त्याची दुर्दम्य इच्छा आहे. आपली सारी बिरादरी दारू, शिकार, भुरट्या चोऱ्या, जनावराच्या पलिकडची भटकंती यात गुरफटलेली आहे; पिढ्यान् पिढ्या आपली चाललेली कुतरओढ आपल्या पोरांच्या वाट्याला येऊ नये, म्हणून हा बाप धडपडतो. जीवाचे रान करतो. पोरे उपाशी असल्यामुळे ज्वारीच्या कणसांची चोरी करणारा बाप प्रकाशने चोरी

केल्यावर त्याला अंगावर वळ उठेपर्यंत बेदम मारतो. घरात दारू पाडून विकण्याचा धंदा असल्यामुळे प्रकाश चोरून दारू पितो. बाप त्याला बरोबर पकडतो. जबर शिक्षा देतो आणि दारूचा धंदाच बंद करतो. म्हणजे संसाराच्या सर्कशीत खोटे बोलणारा गृहस्थ, मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून वाटेल तो त्याग करायला तयार आहे. मात्र आठ-पंधरा दिवस आंघोळीचा पत्ता नसणाऱ्या प्रकाशच्या अंगाचा घुरट वास येत असल्यामुळे वर्गातली मुले, शिक्षक त्याच्याशी तुसड्यागत वागतात. जंगलात राहणाऱ्या, मुक्त संचार करणाऱ्या पारध्याच्या बच्च्याला वर्गातले कुचंबित बंदिस्त वातावरण कसे मानवावे? तो शाळेला दांड्या मारतो आणि शिंदीच्या फोकाने बापाचा मार खातो.

लेखक पारध्यांच्या जीवघेण्या रुढी प्रथांचे दर्शन घडवतो. जातपंचायत कठोर शिक्षा देते. त्यातील काही म्हणजे धारदार गारगोटीने रक्त येईपर्यंत नाकपुड्या कापणे, खांद्यावर जखमा करणे, उकळत्या तेलात हात घालायला लावणे, जातीतून बहिष्कृत करणे, पुन्हा जातीत घेणे. प्रत्येकवेळी दंड म्हणून पंचाला दारू पाजायला लावणे, बोकड, बैल कापून जेवण द्यायला भाग पाडणे, नवऱ्याने बायकोला मारहाण केली पाहिजे आदि भ्रामक समजुतीतून सहज सोडून देणे, त्यांचा छळ करणे. चव्हाण अशा अनेक चालीरीतींची माहिती जाता-जाता देतात. आपापसातल्या हेव्यादाव्यांचे वर्णन करतात. रामभाऊमुळे भिक्याचा दारूचा धंदा कमी होतो. भिक्याचे पोलिसांशी साटेलोटे असल्याने त्यांच्याकडून तो रामभाऊचे दारूचे डबे फोडायला लावतो. पोलीस रामभाऊच्या दारुच्या धंद्याचा पार विध्वंस करतात. त्याला विचारतात, ''अजून कुठं डबे लपविलेत सांग?'' रामभाऊ कमी नाही. तो सरळ भिक्याचे डबे, दारू पाडायचे साहित्य दाखवून, त्याचेही डबे फोडायला लावून अद्दल घडवतो. घर फोडलेल्या गोपाळ पारध्याची पोलिस धुलाई करीत विचारतात, 'माल कुठं ठेवला सांग?' तो गावातल्या किराणा दुकानदार सुखदेव ढोण्याला विकल्याचे खोटे सांगून, कधीकाळी सुखदेवने लिटरभर घासलेट उधार दिले नव्हते त्याचा वचपा काढतो.

शहरातल्या लग्न घरी उष्टया पत्रावळीवर पडलेली पारध्यांची झुंबड काही केल्या हटत नसते. एकजण शक्कल काढतो. मैदानात दोन खुर्च्या मांडून, त्यावर गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेबांचे फोटो मांडतो. ते पाहून अन्नासाठी भांडणारे पारधी, जंग लागलेल्या मशिनीसारखे बंद पडतात. पंख कापलेल्या जिवंत पाखरासारखे तडफडू लागले ''हे तर महार आहेत. ह्याईच्या घरचं अनाज खाऊन आपण सारेच बाटलो,'' म्हणत पश्चात्ताप करू लागले. याप्रसंगातून लेखक आडपडदा न ठेवता, दलितांमधील जातीयता, एक जात दुसरीला हीन लेखून कशी विटाळ पाळते, हे विदारक सत्य दाखवून देतो.

अशा वातावरणातला प्रकाश दहावीला मराठी सोडून सगळ्या विषयात नापास होतो. त्यावेळी वडिलांना झालेले दु:ख लेखक मार्मिक शब्दांत व्यक्त करतो. तो म्हणतो, ''गावातल्या एखाद्या कुवाऱ्या पोरीचं पोट आल्यावर जेवढं दु:ख बापाला होतं, त्यापेक्षा जास्त दु:ख माझ्या बापाले मी नापास झाल्यावर झाले.'' अपयशामुळे पोराला राग यावा, त्याच्यात ईर्ष्या निर्माण व्हावी म्हणून बाप सतत टोमणे मारतो. उपहासाने बोलतो. पुन:पुन्हा नापास झाल्यावर त्याच्याशी अबोला धरतो. परंतु बापाचे संस्कार, त्याची शिक्षणाविषयीची तळमळ, त्यासाठी त्याने केलेले कठोर प्रयत्न, याची पेरणी नकळत स्वरूपात मुलात रुजत जाते. समाजप्रबोधन करणाऱ्या कलापथकातून आणि जगाच्या अनुभवातून तिला खतपाणी मिळते. डॉ.बाबासाहेबांचे विचार कृतीत आणणारा आपला बाप महान असल्याची मुलाला जाणीव होते. तो नेटाने अभ्यासाला लागतो. मॅट्रिक पास होऊन, कॉलेजच्या ग्रंथालयात नोकरी मिळवतो. नोकरी सांभाळून उच्च गुणवत्ता संपादन करून, साहाय्यक ग्रंथपालाचे पद मिळवतो. त्यामुळे आत्मकथनाला उंची प्राप्त होते.

शेवटी बाप बाजी मारतो. या कथानकाचा तोच खरा नायक होतो. त्याच्या शिक्षणविषयक जिद्दीचे कौतुक वाटते. त्याची मुळे गाडगेबाबांची कीर्तने, तुकडोजी महाराजांची भजने आणि बाबासाहेबांची विदर्भातली दलितोद्धाराची चळवळ यांत दडलेली आहेत हे जाणवते. हे आत्मकथन केवळ प्रकाश चव्हाणांचे व्यक्तिगत नसून ती सबंध पारधी समाजाच्या ससेहोलपटीची, परवडीची कथा आहे. त्यातल्या सर्वार्थाने वेगळ्या असणाऱ्या बापाचे, त्याच्या भल्या बुऱ्या स्वभावाचे वास्तव चित्रण केल्यामुळे, लेखकाचा बाप आहे तसा वाचकासमोर प्रगट होतो. त्याच्यातील आधुनिकतेने बुरसटलेल्या, गंजलेल्या पारंपरिकतेविरुद्ध केलेला तो निकराचा संघर्ष आहे.

विदर्भ विभाग पिछाडीवर असला तरी पारधी समाजाच्या मागासलेपणाबाबत तो खूप पुढे गेल्याचे जाणवते. त्यांनी दारू पाडावी म्हणून पोलिस भांडवल पुरवतात. जुलूमजबरदस्ती करून, त्यांचे शोषण करतात. त्यासाठी समाजाची बांधिलकी मानणाऱ्या संवेदनशील पोलिस विभागाच्या उभारणीसाठी वेगळ्या प्रशिक्षणाची नितांत गरज आहे. महाराष्ट्रस्थापनेचा सुवर्णमहोत्सव साजरा करताना कुत्र्या-मांजरागत निकृष्ट दर्जाचे जीवन जगणाऱ्या, पारधी बांधवाच्या उत्थानासाठी समाजाने, शासनाने आतातरी दर्जेदार शिक्षणासह पुनर्वसनाची युद्धपातळीवर व्यवस्था करून, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची प्रकर्षाने निकड आहे. ही बाब प्रकाश चव्हाणांचे 'उदई' अधोरेखित करते.

---

**- प्रा. भगवान इंगळे**
ए/१०३, 'प्रीतिसागर',
लिंक रोड, बोरीवली (प.),
मुंबई - ४०० ०९१.
भ्रमणध्वनी -९९२०४५९७४७

# अध्यक्षीय भाषण : शासकीय कर्मचारी साहित्य संमेलन

## सुरेश खोपडे

दुसऱ्या शासकीय कर्मचारी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी माझी निवड केल्याबद्दल संयोजकांचा मी फार आभारी आहे. अनेक शासकीय कर्मचारी उत्तम लेखण करतात. शासकीय कर्मचाऱ्यांचा जनतेशी खूप जवळून संबंध आल्याने त्यांचे मानवी जीवनाचे आणि स्वभावाचे आकलन मोठे असते. त्यांच्या अधिक व्यापक आणि सुस्पष्ट लिखाणामुळे दूरदृष्टीने विचार करून नियोजन करणे, अंमलबजावणी करणे व शासकीय कर्मचाऱ्यांना कार्यप्रेरित करणे यासाठी शासनाला त्यांची मदत होईल अशी माझी पूर्वीपासूनची धारणा असल्याने संयोजकांच्या विनंतीला होकार देऊन मी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्वीकारले.

शासकीय कर्मचाऱ्यांनी साहित्य निर्माण करण्याचा आणि अशी साहित्य संमेलने घेण्याचे हेतू काय याबद्दलची भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. ज्ञान, नीती आणि सौंदर्य ही मानवी जीवनाची ढोबळपणे तीन प्रमुख अंगे जगभर मानली जातात. साहित्य ही कला असल्याने 'कलेसाठी कला की जीवनासाठी कला' हा वाद शासकीय कर्मचाऱ्यांच्या साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. इमॅन्युअल कांट हा कलेसाठी कला या विचारसरणीचा पुरस्कर्ता मानला जातो. 'Art for art's sake' या क्युओडर गॉतीये यांच्या घोषणेवरून मराठीत 'कलेसाठी कला' असा विचार सुरू झाला. आनंदनिर्मिती हाच साहित्याचा मुख्य हेतू आहे असा युक्तिवाद ना.सी. फडके करीत. वास्तवाचे आणि सत्याचे जेवढे दर्शन शासकीय कर्मचाऱ्यांला होते तेवढे क्वचितच अन्य कोणाला होत असेल. शासकीय कर्मचाऱ्याकडे असलेल्या अनुभवामुळे त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यामुळे वाचकाला जनतेच्या मूलभूत प्रश्नांची जाणीव होणे, अनुभवविश्व समृद्ध होणे आणि वेगळी दृष्टी प्राप्त होणे हे फायदे नक्कीच होतील. निव्वळ सौंदर्यनिर्मिती करणे हा साहित्याचा मुख्य हेतू असावा. साहित्यातून ज्ञानात्मक आणि नैतिक मार्गदर्शन असावे या विचाराशी मी सहमत आहे.

साहित्यनिर्मितीचे अनेक फायदे आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांच्या लेखनामध्ये नैतिकमूल्ये ठळकपणे मांडली गेली तर त्यांचा वाचकावर, इतर शासकीय कर्मचाऱ्यांवर अनुकूल परिणाम घडतो. त्यातून नोकरशाहीची जनमनातील प्रतिमा आणखी उंचावण्यास मोठीच मदत होते. अशा कलाकृतीमध्ये व्यापक व सूक्ष्म स्वरूपात ज्ञान असेल तर ती रसिकाला वेगळ्या प्रकारचा आनंद देऊ शकते. साहित्यनिर्मितीमुळे साहित्यिकाला आपोआप प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा प्राप्त होते, साहित्यिकाच्या व्यवहारज्ञानात भर पडते, उच्च कोटीचा आनंद मिळतो. शासन हे नियम, अधिनियम व कायद्यावर चालते. जनतेच्या सर्व भावना, समस्या त्यात समाविष्ट करणे शक्य नाही आणि त्या तशा केल्या तरी खातेप्रमुख अगर राजकरणी यांच्या आग्रहाखातर काहीवेळा त्याला मुरड घालावी लागते. त्यातून होणाऱ्या कुचंबणेतून बाहेर पडण्यासाठी फ्रॉईड या समाजशास्त्रज्ञाने मांडलेल्या भावनांचे विरेचन (Catharsis) या संकल्पनेची मदत होते. मनातील दडपलेल्या गोष्टी कलात्मक पद्धतीने व्यक्त केल्या तर त्यातून स्वत:ला व इतरांना आनंद देणारे साहित्य निर्माण करता येते.

औद्योगिकीकरणामुळे कुटुंबव्यवस्था विस्कळीत होत आहे. जात, धर्म, भूगोल, इतिहास या कारणांमुळे माणसांमाणसात वितुष्ट निर्माण होत आहे. म्हणून साहित्य समाजात बंधुभावाची भावना निर्माण करण्याचे कार्य करू शकते असे लिओ टॉलस्टॉय म्हणतो. गांधीवादी विचारसरणीनुसार साहित्याने सत्य, अहिंसा, त्याग, जीवनशुद्धी; थोडक्यात नैतिकतेला अधिष्ठान द्यावे असे अपेक्षित आहे. मार्क्सवादी विचारसरणीवर भर देणारे साहित्याची सामाजिक उपयुक्तता याला महत्त्व देतात. ना.सी. फडके यांचे साहित्य रंजनवाद किंवा भोगवादाला पूरक आहे असे मानले जाते.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या साहित्याला आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांना खात्यातून पाठबळ मिळत नाही असा सार्वत्रिक अनुभव आहे. याचे कारण शोधणे मनोरंजक ठरेल.

ब्रिटिश येण्याअगोदर भारतात जे सरकारी अधिकारी होते त्यांना आतासारखे नियम नव्हते. पाटलाचा, कोतवालाचा व कुलकर्ण्यांचा मुलगा अनुक्रमे पाटील, कोतवाल व कुलकर्णी होत असे. हे पद वंशपरंपरेने येत असे. निवृत्तीचे वय ठरलेले नसे, ऑफिसची वेळ ठरलेली नसे, त्यांची बदली होत नसे. कार्यपद्धतीचे नियम ठरलेले नसत. त्या व्यवस्थेला पारंपरिक (Traditional) मॉडेल म्हणत असत. क्वचित प्रसंगी एखादा बलदंड इसम आपल्या करिष्म्यावर ते पद मिळवत असे. याला करिष्मायुक्त (Charismatic) मॉडेल म्हणत. ब्रिटिशांनी या दोन्ही मॉडेलांना छेद देऊन आता अस्तित्वात असलेली नोकरशाही -जिला रॅशनल लिगल मॉडेल म्हणतात- अस्तित्वात आणली. या मॉडेलनुसार सरकारी नोकर निवडताना आनुवंशिकतेऐवजी परीक्षा घेण्यात येऊ लागली. शिक्षणाची अट ठरली, निवृत्तीकाळ ठरला, बदलीचे तत्त्व ठरले, कामाचे नियम अधिनियम, कार्यपद्धती ठरली. कर्मचाऱ्यांच्या अधिकारांची उतरंड ठरली. मॅक्स वेबरच्या मते अशी व्यवस्था निर्माण केली की, प्रत्येक नोकरशहा हा रॅशनल ॲक्टर बनेल व कोणतीही संघटना यंत्रासारखी काम करील. सध्या जगभर या नोकरशाहीने विळखा घातलेला आहे.

रॅशनल लिगल मॉडेलने शिस्तबद्ध यंत्रणा निर्माण झाली तरी तिच्यामध्ये अनेक दोष आले. नोकरशहाने नोकरीचे ठिकाण व जनता यांच्याशी कोणतेही भावनिक नाते ठेवू नये; तसेच नोकरशहाने दिलेल्या चौकटीत काम करावे, त्याला अतिउत्साह दाखवण्याची अजिबात गरज नाही असे वेबर प्रणित मॉडेलमध्ये अपेक्षित आहे. नोकरशहांच्या भावना आणि प्रेरणा मारल्या जातात हा या मॉडेलचा पहिला मोठा दोष आहे. नियमावर बोट ठेवणारे प्रेरणाहीन व भावनाशून्य नोकरशहा निर्माण झाल्याने जनतेच्या तक्रारी साचत राहू लागल्या. त्यातून रेडटेपीझमचा उदय झाला.

दुसरा दोष जैसे थे वाद/स्थितिवादी वृत्ती. जुने नियम आणि नवीन प्रश्न यांमुळे नवीन प्रश्नांची सोडवणूक बंद झाली. नवीन प्रश्नांना नवीन उत्तरे देण्यासाठी जास्त बौद्धिक आणि शारीरिक श्रमांची गरज भासते. सरकारी नोकरीत मोठी सुरक्षा असल्याने जुनी चौकट मोडण्यास कोणी तयार होत नाही. कोणताही बदल हा मृत्यूसारखा क्लेशकारक असतो त्यामुळे बहुतेकजण 'जैसे थे' वादी बनतात. नविन्याला विरोध करतात. वेबेरियम मॉडेल हे पाश्चिमात्य संस्कृती व प्रगत देशावर बेतलेले आहे. भारतासारख्या प्रगतीशील देशात वेबेरियन मॉडेलमधील नोकरशहा हा रॅशनल ॲक्टर बनण्याऐवजी सोशल ॲक्टर बनतो. फ्रेड रिग्ज यांनी भारतासह इतर प्रगतिशील देशातील प्रशासनाचा अभ्यास केला. त्यांच्या मते कोणत्याही देशातील प्रशासनव्यवस्था ही त्या देशातील सामाजिक व्यवस्थेची उपव्यवस्था असते. भारताची सामाजिक व्यवस्था ही मनुस्मृतीवर आधारित आहे. वर्णव्यवस्था हा तिचा प्राण. उच्चवर्ण दुसऱ्या वर्णाला तुच्छ समजतो. सध्या ही कृती समाजात जशी छुप्या प्रमाणात आढळते तशीच ती भारतीय प्रशासनातही छुप्या प्रमाणात पण घातक स्वरूपात आढळते. हुद्याप्रमाणे उच्च-नीचता ठरते. प्रशासनातील या व्यवस्थेचे वेगळे वैशिष्ट्य असे की, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बळ इसम उच्चाधिकारी झाला की तो प्रशासनात उच्चवर्णीय बनतो. खालच्यांना तुच्छ समजायला लागतो. वर्णाश्रमात लिहिणे, बोलणे, कला निर्मिती करणे ही उच्चवर्णीयांची मक्तेदारी आहे. इतरांना ते जमणार नाही अशी जी धारणा आहे तशीच धारणा कनिष्ठ शासकीय कर्मचाऱ्याच्या साहित्याबद्दल व इतर सर्व सृजनशीलतेबद्दल वरिष्ठांची असते. सृजनशीलता ही काही वरिष्ठ नोकरशहाची मक्तेदारी नाही. कोणत्याही खात्यातील एखादा कनिष्ठ कर्मचारीही शासनास नवनिर्मितीची दिशा दाखवू शकतो. रेड टेपिझम आणि जैसे थे वादी सारखी वृत्ती घालविण्यासाठी सृजनशील साहित्याची गरज निर्माण होते.

स्वैर आणि दिशाहीन लेखन टाळण्यासाठी लेखकाने बांधिलकी स्वीकारणे आवश्यक आहे. सार्त्र या विचारवंताने साहित्यक्षेत्रातील बांधिलकी-बद्दल मांडणी करण्याचा प्रयत्न केला. प्रचलित काळात साहित्यिकाला कोणतीतरी भूमिका घ्यावी लागणार. तटस्थपणे राहून जगता येणार नाही. जीवनाबद्दलच्या कोणत्याही एखाद्या दृष्टिकोणाचा विचार करून त्याप्रमाणे लिहीत राहणे आणि त्याप्रमाणे कृती करणे आवश्यक आहे. लेखनकृती ही स्वातंत्र्यावर आधारलेली नैतिक कृती असल्याने लेखकाने स्वत:च्या स्वातंत्र्याप्रमाणे वाचकाच्या स्वातंत्र्याचीही बूज राखली पाहिजे असे तो म्हणतो.

मार्क्सवादी विचारवंतानुसार साहित्यिकांनी कोणीतरी निश्चित अशी सामाजिक, राजकीय भूमिका स्वीकारली पाहिजे. लेखक म्हणून समाजाविषयी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. आपल्या काळातील समाजाचे यथार्थ दर्शन घडवावे. सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्यांच्या बाजूने उभे रहावे. तकलादू मूल्यांचे खोटेपण उघडकीस आणावे, सामाजिक परिवर्तनासाठी आपले साहित्य वापरावे. मार्केट इकॉनॉमीचे पुरस्कर्ते आधुनिक अर्थशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, तंत्रज्ञान यावर भर देतात. ॲडरेथ या विचारवंतानुसार साहित्यिकांनी स्थितीप्रिय, अन्यायी, शोषण करणाऱ्या व्यवस्थांविरुद्ध काम करणाऱ्यांच्या बाजूने आपली लेखणी चालवली पाहिजे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या साहित्याला बांधिलकी असली पाहिजे आणि ती त्याला त्याच्या लाभार्थीशी (Stake Holder) जोडावी लागेल. पहिला लाभार्थी म्हणजे जिच्या करामधून त्याचा खर्च भागवला जातो आणि ज्याच्यासाठी नेमणूक झालेली आहे ती जनता आणि दुसरा लाभार्थी म्हणजे ज्यांच्या साहाय्याने हे काम पूर्ण करायचे ते कनिष्ठ कर्मचारी. जनतेतील काही गट पैसा,

सत्ता, ज्ञान याच्या जोरावार स्वत:साठी शासकीय सेवा उपलब्ध करून घेऊ शकतात. आर्थिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या मागास, अल्पसंख्यांक, शेतकरी, कामगार, असंघटित कामगार यांना कुणी वाली उरत नाही. साहित्यिकांना बांधीलकी ठरवताना या गटाचा प्राधान्याने विचार करावा लागेल. सरकारी नोकरीतील तोच तो पणा, साचलेपणा, निराशा, हडेलहप्पीपणा, सांगकाम्यावृत्ती नष्ट करण्यासाठी प्रेरणादायक साहित्य निर्माण करता येऊ शकते.

गांधीवादात नैतिक मूल्याचे आचरण करून, ताठ मानेने उभे राहून कार्यप्रेरित होण्याची प्रचंड क्षमता आहे. मार्क्सवाद सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बळ व अल्पसंख्यांक, असंघटित कामगार, शेतकरी, प्रशासनातील तळाचे कर्मचारी या घटकांची प्राधान्याने दखल होतो. मार्क्सवादी साहित्यामुळे या घटकाचे जीवनाचे आणि संघर्षाचे वास्तव चित्रण होईल. पुरोगामी विचाराला चालना देणारे, त्यांच्या न्याय्य हक्कासाठी मांडणी करणारे या गटाच्या विकासास मदत करणारे साहित्य निर्माण होऊ शकेल. गांधीवादाचा पाया, फुले, मार्क्स, लेनिन, माओवादाच्या भिंती व मार्केट इकॉनॉमी वादाचे छत घेऊन साहित्याचा इमला उभा करण्याचा प्रयत्न केला तर त्यात सर्व भारतीयांना सुरक्षित वाटून त्यांचे कल्याण होईल.

हे विचार केंद्रस्थानी ठेवून शासकीय कर्मचाऱ्यांनी लेखन केले तर त्यांचे लाभार्थी म्हणजेच जनता आणि कनिष्ठ सहकारी यांच्या जीवनाची गुणवत्ता आणि जगण्याची प्रत उंचावण्यास नक्कीच मदत होईल. त्यामुळे साहित्याला अभिप्रेत असलेले आत्मोद्धार, समाजोद्धार व राष्ट्रोद्धार हे हेतू नक्कीच साध्य होतील याबद्दल मी आशावादी आहे.

**(१४ फेब्रुवारी २०१०, अकोला)**
**सुरेश खोपडे**
विशेष पोलीस महानिरीक्षक




## बदलत गेलेली सही

अंजली कुलकर्णी

सही म्हणजे स्वओळख. ‘बदलत गेलेली सही’ हा कवितासंग्रह म्हणजे माणसांच्या, हरवत चाललेल्या स्वओळखीच्या शोधाचा प्रवास...

**मूल्य १२० रुपये; सवलतीत ७५ रुपये**



## या शतकाचा सात-बाराच होईल कोरा...

शंकरराव दिघे

या दीर्घ कवितेचा महानायक आहे ते विस्कटून चाललेले प्रातिनिधीक खेडे. तेथील उद्ध्वस्त होत असलेली माणसे, समतोल साधणाऱ्या पण लयाला चाललेल्या व्यवस्था आणि भरकटत चाललेली मूल्यसंचिते. लेखणीच्या फटकाऱ्यातून उभी राहतात या साऱ्याची अर्कचित्रे...

**मूल्य ८० रुपये; सवलतीत ५० रुपये**



## उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स

गोविंद काजरेकर

भोवतालच्या विनाशक दमनव्यवस्थांमुळे वर्तमान समाजात निर्माण झालेले अराजक, विसंगती आणि त्यातील हास्यास्पदता उघड करणारी कविता.

**मूल्य ७५ रुपये; सवलतीत ४५ रुपये**

# मराठीसाठी माहिती तंत्रज्ञान...

## धनंजय गांगल

यंदाच्या पुण्याच्या साहित्य संमेलनात, शनिवारी दुपारच्या सत्रातील- १) माध्यम तंत्रज्ञान आणि मराठी भाषा, आणि २) अभिव्यक्ति स्वातंत्र्य हे दोन परिसंवाद मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या अचानक येण्यामुळे एकत्र घेण्यात आले. त्यामुळे 'अभिव्यक्तिने' 'माध्यम तंत्रज्ञानावर कुरघोडी केली हे वेगळे सांगायला नको. पण याच्या, साधारण एक आठवडा आधी, २१ मार्च रोजी, सुधींद्र कुलकर्णी (ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन) आणि दीपक पवार (मराठी अभ्यास केंद्र) यांच्या पुढाकाराने 'मराठीसाठी माहिती तंत्रज्ञान, मराठीतून माहिती तंत्रज्ञान' असा एक दिवसीय परिसंवाद 'ऑब्झर्व्हर'च्या कार्यालयात, नरीमन पॉईंट येथे आयोजण्यात आला होता.

या परिसंवादाची सुरुवात सकाळी १० वाजता झाली. सुधींद्र कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक केले. त्यानंतर दीपक पवार व राममोहन खानापूरकर यांनी या परिसंवादाचे प्रयोजन व्यक्त केले आणि या विषयातील शासनाच्या 'कमालीच्या' उदासीनतेकडे लक्ष वेधले. उर्वरित परिसंवादाने तो एक सूर घट्ट पकडून ठेवला. त्यानंतर मोहन तांबे आणि महेश कुलकर्णी यांनी सी-डॅक या संस्थेने केलेल्या कामावर प्रकाश टाकला. संगणकावर भारतीय भाषासंबंधी सी-डॅकने जे मुलभूत आणि भरीव काम केले आहे त्याचे सगळ्यांनाच कौतुक वाटले. अर्थात या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञ मंडळीपर्यंतही हे काम एवढे दिवस कसे पोचले नाही याचे सगळ्यांनाच आश्चर्य वाटले. ते सी-डॅकच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे पण इंटरनेट महाजालच्या संकेतस्थळांच्या जंजाळात- संकेतस्थळावरची उपलब्धता म्हणजे काळोखात डोळा मारण्यासारखे असते. त्यामुळे याची वृत्तपत्रात सी-डॅकने जाहिरात करायला पाहिजे होती असे मत व्यक्त झाले!

यानंतर लीना मेहेंदळे यांचे सादरीकरण झाले. अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून महाराष्ट्र शासनात काम करताना मराठी संगणकी-करणासाठी केलेले छोटे-छोटे प्रयत्न आणि ते राबवताना येणाऱ्या अडचणी त्यांनी नेमकेपणाने मांडल्या. या विषयातील त्यांचा उत्साह लक्षात राहिल असा होता. ॲड. जय भावे यांनी एकूणच तंत्रज्ञानात 'कोर्ट' किती पिछाडीवर आहे- मराठीकरण तर दूरची बात है अगदी थोडक्यात आणि मार्मिकपणे सांगितले. एकूणच परिसंवादाचा शासनविरोधी कल असताना शासनाची बाजू सावरण्याची जबाबदारी 'ग्रामीण विकास, पंचायत' विभागाचे सचिव सुधीर ठाकरे यांच्यावर पडली. लोकांपर्यंत योजना आणि सुविधा पोचणे ही प्राथमिक गरज असल्याने -'मराठी ॲक्टीव्हीझम'ला काहीवेळा थोडे दुय्यम स्थान मिळते अशी त्यांनी मांडणी करताच एकच गदारोळ उठला. त्यांच्या 'मराठी ॲक्टीव्हीजम' आणि 'कन्व्हिनियन्स' या शब्दांवर अनेकांनी आक्षेप घेतले. मग त्यांनीही शिताफीने प्रमाणभाषेकडे रोख वळविला!

दुपारी 'आय.एल. अँड एफ. एस.' कंपनीच्या शैक्षणिक विभागाचे निनाद वेंगुर्लेकर यांनी इंटरनेट आणि मराठीचे अत्यंत आशावादी आणि लाघवी भविष्य रेखाटले. जेवढा जमेल तेवढा मराठी व्यवहार आणि साहित्य इंटरनेटवर टाकण्याचा त्यांनी आग्रह धरला. निनादचे आग्रही आणि आशावादी सादरीकरण सगळ्यांनाच भावले. यापुढचे डॉ. श्याम आणि रत्ना अष्टेकर यांचे 'आरोग्यविद्या' सादरीकरण सर्वांनाच स्पर्शून गेले. एका सीडीवरील बहुमाध्यम प्रणालीतून लहान लहान प्रश्नांना सहज उत्तरे देत प्राथमिक रोगनिदान करण्याचं तंत्र कोणालाही उपयुक्त आहेच आणि जेथे प्राथमिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध नाही तेथे तर या तंत्रज्ञानाचा अचूक उपयोग थक्क करणारा!

माध्यमांच्या वतीने मटाचे नीलेश बने आणि लोकसत्ताचे विनायक परब यांनी आपपल्या संकेतस्थळासंबधीचे अनुभव मांडले. आय.बी.एन. लोकमतच्या ज्ञानदा देशपांडेने मराठीच्या प्रमाणीकरणासंदर्भात पुणेरी ब्राह्मणी ऐवजी देहूआळंदीस केंद्र मानल्यास त्याला व्यापक परिणाम लाभू शकेल असे सुचवले. नेटवरच्या जागतिकीकरणाला आपली भाषिक अस्मिता कसा लढा देणार असा प्रश्न मांडला.

या चर्चासत्रातील शेवटचा विभाग होता -'राजकीय पक्षांची भूमिका आणि प्रयत्न'. याला शिवसेनेचे भारतकुमार राऊत आणि भाजपचे माधव भंडारी उपस्थित राहू शकले नाहीत. यावरुन या पक्षांना याप्रश्नांचे किती महत्त्व आहे. यावरही टीपणी झाली. मनसेचे अनिल शिदोरे यांनी एकाकी किल्ला लढवला. प्रथम त्यांनी इंटरनेटबद्दलच्या (अति) उत्साहाचा प्रतिवाद केला. इंटरनेटवरचे जग खरे किती खोटे किती? त्यावर किती विसंबायचे आणि रमायचे असा थेट प्रश्न उपस्थित करून त्यांनी सर्वांना अंतर्मुख व्हायला भाग पाडले. माहिती आणि ज्ञान यांच्यातील विसंगतीवर त्यांनी अचूक बोट ठेवले.

ऑब्झर्व्हरचे अनय जोगळेकर आणि दीपक पवार यांनी चर्चासत्राचे संचालन केले. दीपक पवार यांनी त्याबद्दल मार्मिक टीपणी

केली. विशेषत: महाराष्ट्रातील व्यवहार मराठीतून करणे हेच नैसर्गिक आहे आणि हा कुठलाही ॲक्टिव्हीजम् किंवा विकृती नसल्याचे ठासून सांगितले.

श्री. सुधींद्र कुलकर्णी यांनी चर्चासत्राचा समारोप केला तेव्हा संध्याकाळचे सात कधी वाजले ते लक्षातच आले नाही. त्यानंतर बराच काळ चर्चा करत माणसं रेंगाळली.

इंटरनेट, त्यावर मराठीचा आग्रह आणि त्यासंबंधीचे तंत्रज्ञानाचे आणि भाषेचे प्रमाणीकर या मुद्यांभोवती मुख्यत: चर्चा फिरली. क्वचित काही वेळा 'मराठी आणि मराठीच' अशी टोकाची भूमिकाही व्यक्त होत होती. चीनने गुगलला जसे हद्दपार केले तसेच आपण मराठीबाबत चालढकल करणाऱ्या मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यांबाबतही करावे असाही विचार प्रकट झाला. अर्थात् चीनचे गुगलशी भांडण भाषेसंबंधी नसून सेन्सॉरशिप संबंधात आहे. दुसरा एक विरोधाभास म्हणजे मराठीचा राजकीय लढा हिंदीशी आहे तर तंत्रज्ञानाचा लढा इंग्रजीशी! असो. पण परिसंवाद अत्यंत सकस झाल्याचे समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होते. प्रत्येकाला खूप काही सांगायचं होते, जाणून घ्यायचे होते. पण वेळ अपुरा पडला!

या चर्चासत्राच्या निमित्ताने दीड दशकापूर्वी १९९०च्या मध्याला, सिलिकॉन व्हॅलीमध्ये आयोजलेल्या इंटरनेटवरच्या एका परिसंवादाची आठवण जागी झाली. आय.टी. जगतातल्या तेव्हाच्या मोठमोठ्या हस्तींनी तेथे हजेरी लावली आणि आपली व्हिजन व भाकितं यातून भविष्यातील इंटरनेटमय जगाचे चित्र रेखाटले. इंटरनेटमुळे जग आमूलाग्र बदलून जाईल याबद्दल सगळ्यांचे एकमत होते. देश, धर्म, जात, भाषा, संस्कृती यांच्या सीमारेषा पूर्ण पुसल्या जातील आणि एकच एक 'ग्लोबल व्हिलेज' असेल आणि जगातला प्रत्येक मनुष्य या 'ग्लोबल व्हिलेज'चा आणि फक्त याच व्हिलेजचा नागरिक असेल. जगाचा एकच धर्म असेल (माणुसकी-कम-ख्रिस्टॅनिटी), एक भाषा (इंग्रजी), एक संस्कृती (अमेरिकन!) -असे काहीसे ते स्वप्न होतं, इंटरनेट हे सर्वसमावेशक सर्व जग व्यापून (वर दशांगुळे उरलेले) असेल. व्यक्तिचे अस्तित्व एकतर इंटरनेटवर असेल किंवा तो (व्यावहारिकदृष्ट्या) जवळपास अस्तित्वातच नसेल! आयडीयाज आयडीयाज आयडीयाज! त्या सुचणे हे मानवी शक्तीचे मूलभूत एकक असेल. बाकी सगळी काळजी इंटरनेट घेईल!

'ओरॅकल' ही माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दादा कंपनी. तिचा मुखिया लॅरी एलिसन. त्याचा विश्वास असा होता की जगातील सर्व व्यवहार फक्त इंटरनेटवर होतील आणि त्यासाठी वेगळ्या प्रकारचे इंटरनेट चलन लागेल. 'बीनझ' नावाने त्याने ते अस्तित्वातही आणले. व्यक्तिगत संगणकात (पीसी) मध्ये हार्ड डिस्क आणि ऑपरेटिंग सिस्टिमची (विंडोजची) गरजच उरणार नाही असे त्याचे मत होते. कारण घरात जसे कुठलेही पैसे ठेवण्याची गरज नाही सगळे काही इंटरनेटवरच्या आपल्या बँक अकांऊटमध्ये असतील तशीच आपली सगळी माहितीचे दस्ताऐवज इंटरनेटवरील आपल्या कपाटात असतील! बिल गेटस्‌ला मात्र हे मान्य नव्हते. स्वत:ची अशी स्पेस, जागा पर्यायाने हार्ड डिस्कची गरज लागेलच असे त्याचे मत होते.

हे सगळे ऐकायला अद्भुत होते. इंटरनेटचा दबदबा एवढा होता की नेटशी काहीही संबंध नसलेल्या कंपन्याही आपल्या नावाआधी 'श' किंवा पुढे 'डॉट कॉम' लावण्याच्या धडपडीत होत्या. शेअर मार्केटमध्ये मार्च २००९ मध्ये हा फुगा फुटला. ही घटना 'डॉट कॉम बस्ट' नावाने प्रसिद्ध आहे!

आज २०१० इंटरनेट आपल्याला व्यापून असले तरी त्या बड्या हस्तींच्या स्वप्नातील इंटरनेट त्या अर्थाने अवतरले नाही! इंटरनेटने जग जवळ आले असले तरी देश, धर्म, भाषा, जात, पंच यातील सीमा आहेत. तशात आहेत किंबहुना त्या अधिक खोल करण्यासाठी इंटरनेटचा उपयोग होतो आहे. मानवी सांस्कृतिक व्यवहारातील एक वेगळीच क्रांती मात्र शांतपणे घडतेय आणि ती मुख्यत: इंटरनेटमुळे. साधारण १८ व्या शतकापर्यंत मानवी व्यवहारात 'मौखिकाला' महत्त्व होते, १९व्या शतकात लिखित शब्दाला. आदान-प्रदान, शिक्षण, गुणवत्ता हे सगळं मुख्यत: लिखित शब्दाभोवती रचलेले होते. एकविसावे शतक मात्र बहुतेक दृकश्राव्यांचे दिसताय. आपल्या व्यवहारात एकूणच शब्दसंकोच होत चाललाय. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी शब्दांपेक्षा एखादी भेट, चित्र, ग्रीटींग, स्माईलीज वापरणं आपल्याला जास्त सोयीस्कर वाटतेय. वृत्तपत्रातही लिखित शब्द जवळजवळ तेवढीच जागा व्यापलेल्या चित्राभोवती मांडलेले असतात. पुणे साहित्य संमेलनात अमिताभ आणि सचिव यांना पाहुणे म्हणून बोलावणे हा योगायोग नव्हता. लिखित शब्दांना उमटायलाही आता या दृष्य आयकॉन्सची गरज पडू लागली आहे!

**– धनंजय गांगल**
dhananjay.gangal@gmail.com



**भिडू**
**भगवान इंगळे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथाचा सहवास

## डॉ. मंदा खांडगे

पुस्तकं वाचल्यानं जो आनंद मिळतो, त्यासारखा दुसरा कुठलाही आनंद नाही. पुस्तकांचा संग्रह करावा; आपल्याला वेळ मिळेल तेव्हा आपल्या संग्रहातलं पुस्तक काढून वाचावं, परत परत वाचावं. वाचू तितक्या वेळा ते आपल्याला असं ज्ञान, मनोरंजन, संस्कार, विचार करायला लावणं, रसग्रहणाची शक्ती खूप काही देऊन जातं. लहानपणापासून मला पुस्तकांचा खूप सहवास मिळाला. किंबहुना, पुस्तकांच्या ढिगातच माझं बालपण गेलं असं म्हटलं तर वावगं होणार नाही. घरी आनंद आणि शालापत्रक मासिकांचे अंक येत. अगदी पहिल्या अंकापासूनचे प्रत्येक वर्षाचे अंक आजोबांनी बाईंड करून ठेवलेले होते. ते वाचायला मिळत. वडिलांची 'मन्वंतर वाचनमाला'. ही पाठ्यपुस्तकं पहिली ते चौथी आणि पाचवी ते सातवीला क्रमिक पुस्तकात अनेक वर्षं होती. ती तयार करण्यासाठी अनेक पुस्तकांतले गद्य-पद्य उतारे निवडण्यासाठी वडील पुस्तकं खरेदी करत. क्रमिक पुस्तकं १९७० च्या आसपास सरकारी झाली तोपर्यंत म्हणजे जवळजवळ ३५-४० वर्षं वडिलांची ही पाठ्यपुस्तकं अभ्यासक्रमात होती. त्यामुळे आपोआपच घरात पुस्तकांची रेलचेल होती. अगदी बालगटापासून किशोर गटापर्यंतची पुस्तकं त्यात होती. याशिवाय वडिलांनी खूप पुस्तकं विकत घेतलेली होती. ते स्वतः कवी असल्यानं त्यांच्याकडे कवितेची पुस्तकंही भरपूर होती.

बालपणात वाचलेली अनेक पुस्तकं मला आठवतात. त्यात वा.गो. आपट्यांचे रामायणाचं पुस्तक, गोष्टीरूप महाभारत. शं.रा.देवळे यांची चारित्रकथांची अनेक पुस्तकं. इसापनीतिकथा, वि.कृ. श्रोत्रिय यांचा दहा कुमार चरित्रांचा संच, ताम्हनकरांचा गोट्या, वि.वि. बोकिलांचा वसंत; बेबीचा भाऊ, भा.रा. भागवतांची जाईची नवलकहाणी, रॉबिन हूड, तीन शिलेदार, टारझनचे दहा भाग, अमरेंद्र गाडगीळांचे ताई आणि भाऊ, प्रवासी राम, साने गुरुजींची जवळजवळ सगळी पुस्तकं, गोड गोष्टीचे दहा भाग, तीन मुले, सोनसाखळी, फुलांचे प्रयोग, बेबी सरोज आदी आणि माझं आवडतं पुस्तक श्यामची आई. आठवणीत असलेली अशी कितीतरी ही पुस्तकं माझं बालपण समृद्ध करून गेली. आजही ती मुखपृष्ठांसह स्मरणात आहेत.

आजोबा आम्हा मुलांना वाढदिवसाला पुस्तकं आणून देत. त्यात त्यांनी मला दिलेली शं.रा. देवळे यांची थोरांच्या नवलकथा, के. नारखेडे यांचे जलवंती, गो.नी.दांडेकरांची आईची देणगी, ह. ना. आपटे यांचे गड आला पण सिंह गेला, चिं.वि.जोशी यांचे चिमणरावाचे चऱ्हाट, साने गुरुजींचे श्यामची आई, नाथमाधवांचं सावळ्या तांडेल ही पुस्तकं आठवतात. त्यांना मी छान कव्हरं घालून माझ्या कपाटात ठेवली होती. हळू हळू त्यात भरच पडत गेली. आणखी एक गोष्ट मला आठवते. आमच्या शाळेत, हुजूरपागेत वाचनाचा तास आठवड्यातून दोनदा असायचा. त्यावेळी वर्गात पुस्तकाची पेटी यायची. त्यातली पुस्तकंही वाचायला मिळत. शिवाय, शाळेच्या ग्रंथालयातूनही पुस्तकं मिळत.

ही सारी पुस्तकं मी अधाशासारखी वाचायचे. तहानभूक विसरून. आता वाटतं, आमच्या बालपणी दूरदर्शनसारखं माध्यम नव्हतं, हे एक प्रकारे बरंच झालं. चित्रपटही खूप प्रमाणात पाहण्याचं वेड नव्हतं. त्यामुळे अभ्यासाखेरीज वाचन, खेळ यावरच आमचा पिंड पोसला गेला. बालपणात वाचनाला दिशा नव्हती असं नाही. तरी हाती मिळतील ती गोष्टींची, कवितांची पुस्तकं वाचून काढली. त्यातल्या त्यात कुठली पुस्तकं वाचायला हवीत हे आजोबा सांगायचे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुस्तकं घेतली जायची. ते हाडाचे शिक्षक होते. पुढे शिक्षण खात्यात अधिकारी होते. त्यांचं स्वतःचं एक सुंदर पुस्तक होतं, 'जोडाक्षर पाठमाला'. त्यात सचित्र सुंदर कथा होत्या त्या मला फार आवडत. त्या कथांनी अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. उतावळेपणा करू नये. मोठ्या माणसांचं ऐकावं वगैरे. साने गुरुजींचं साहित्य आज मुलांच्या दृष्टीनं कालबाह्य वाटेल. कदाचित त्यांना ते आमच्या पिढीइतकं आवडणार नाही. पण आमच्या दृष्टीनं कुणालाही वाचनाचा छंद लागावा असं त्यांचं साहित्य होतं. गुरुजींनी धुळ्याच्या तुरुंगात गोड गोष्टी लिहिल्या. 'करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयाचे' हे बोधवचन त्यांच्या साहित्यात ठायी ठायी वाचायला मिळतं. मुलांना घडवावं, त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावे हाच त्यांच्या लेखनाचा उद्देश होता. खरंच आज मागे वळून पाहताना असं वाटतं की योग्य वयात योग्य ती पुस्तकं वाचायला मिळाली. घरातल्या वातावरणामुळे वाचनाचा छंद चांगला जोपासला गेला. पुढल्या आयुष्यातही ग्रंथांची साथ मिळाली. साहित्यकार आणि समाजसेवक असलेल्या साने गुरुजींनी साहित्याला साधन मानलं. त्यांची 'श्यामची आई' लहान मुलांच्या मनामनावर कोरली गेली. श्यामच्या रुपानं आणि त्याच्या आईच्या रुपानं गुरुजींनी तत्कालीन आम्हा मुलांना सहिष्णुतेचे धडे दिले. मला हे पुस्तक म्हणजे मातृप्रेमाचं महन्मंगल स्तोत्रच वाटतं. आईच्या संगतीत मोठा होण्याचा ध्यास, त्यांच्या घडण्याकडेच साऱ्या वृत्ती गुरुजींनी केंद्रित केल्या आहेत. त्याचं घडणंही

बालसुलभ दाखवलं आहे. त्यामुळे तो श्याम फार खोल असा त्या संस्कारक्षम वयात भावला आणि त्याची आईही. योग्य वयात आपल्या मुलावर संस्कार करणारी, त्यासाठी प्रसंगी कठोर होणारी. पायाला माती लागेल म्हणून आईला पदर पसरायला सांगून त्यावर पाय ठेवणाऱ्या श्यामला ती सांगते, ''पायाला माती लागेल म्हणून जपतोस, मनालाही तसेच जप हो.'' आईच्या संस्कारशील विचारांची झेप केवढी मोठी आहे हे या उद्‍गारावरून समजलं.

याच वयात रवींद्रनाथ टागोरांच्या कथाही आवडल्या. पोस्टमास्तरनं तर मनात घर केलं. काबुलीवालाची कथा वाचताना मन व्याकुळ व्हायचं. अमरेंद्र गाडगीळांच्या ताई आणि भाऊनं भावंडांच्या अमर प्रेमाची कथा मनावर ठसवली. त्याचा प्रभाव दीर्घकाळ राहिला. त्यांचं 'प्रवासी राम' हे प्रखर देशनिष्ठा देणारं पुस्तकंही असंच भावलं. आणखी कितीतरी पुस्तकांबद्दल सांगता येईल. वडिलांनी 'बालशारदा' हे बालकवितांचं पुस्तक संपादित केलं होतं. त्याकाळात म्हणजे ७५ वर्षांपूर्वी ती अभिनव अशी कल्पना होती. पाठ्यपुस्तकांतील कवितांखेरीज अतिशय सुंदर, सुबोध कविता त्यात होत्या. त्यातल्याच कविता पुढे अनेक पाठ्यपुस्तकांत समाविष्ट झाल्या. 'श्रावणमासी हर्ष मानसी' या बालकवींच्या कवितेनं निसर्गाच्या जवळ नेलं. माझ्या वडिलांच्या म्हणजे ग.ह.पाटलांच्या 'शर आला तो धावुनी आला काळ', या श्रावणबाळाच्या कवितेनं किंवा रेव्हरंड टिळकांच्या 'वन सर्व सुगंधीत झाले', 'रानात एकटेच पडलेले फूल', 'बाणानं विद्ध झालेल्या पक्षिणीच्या', 'निष्प्राण देह पडला श्रमही निमाले' या आणि अशा अनेक कवितांमुळे दया, वात्सल्य, करुणा या भावना त्या नकळत्या वयात मनात रुजल्या. ग.ह. पाटलांच्या 'इतुके सुंदर जग तुझे जर। किती तू सुंदर असशील' या देव कवितेतील ओळींनी माझ्यासह अनेक बालमनांना सौंदर्याचे संस्कार दिले. हे जग आणि त्याचा निर्माता याबद्दलची ही भावना मनावर इतकी ठसली की पुढील आयुष्यात रुक्षपणा आला नाही.

पुढील काळात म्हणजे विद्यालयीन शिक्षण संपलं आणि कुसुमाग्रज, वसंत बापट, पाडगावकर यांच्या कविता आवडू लागल्या. वडिलांनी या तीनही कविंची पुस्तकं आणून दिली. या काळात मला कुसुमाग्रजांच्या कवितेनं भारून टाकलं होतं. गर्जा जयजयकार क्रांतीचा ही स्फुल्लिंग चेतवणारी कविता, पृथ्वीचे प्रेमगीत, वेगात दौडले वीर मराठी सात, आगगाडी आणि जमीन, सौंदर्यलक्षी, चिंतनगर्भ अशा त्या कवितांनी मनावर गारुड केलं होतं. मर्ढेकर, बोरकरांचे संग्रह घरात होते. मर्ढेकर समजायला थोडा वेळ लागला. याच सुमारास दुर्गा भागवतांच्या निसर्गाचा साक्षेपाने वेध घेणाऱ्या 'ऋतुचक्र'नं झपाटून टाकलं. निसर्ग आणि मानवाचं अतूट नातं चित्रित करणाऱ्या या पुस्तकाची मी अनेक पारायणं केली. आजही मला हे पुस्तक तितकंच प्रिय आहे निसर्गातील वस्तुजाताकडे डोळसपणे सौंदर्यलक्षी वृत्तीनं पाहायला मला शिकवलं ते 'ऋतुचक्र'नं. रेव्हरंड टिळकांच्या सहवासात स्वतःला विकसित करणाऱ्या स्वतंत्र वृत्तीच्या लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' हे हृदयस्पर्शी आत्मचरित्र अजरामर आहे. सहजता हा या लेखनाचा स्थायिभाव आहे. नितळ, आरस्पानी अशा या लेखनानं मी प्रभावित झाले. ऋतुचक्राप्रमाणेच स्वामी आणि मृत्युंजयची मी अनेकदा पारायणं केली. याच सुमारास मला वडिलांनी 'युगान्त' आणून दिलं. महाभारतातील कर्णाची व्यामिश्र व्यक्तिरेखा 'मृत्युंजय'मध्ये पूर्णपणे सहनुभूतीकडे कललेली. युगान्त वाचलं बी.ए.च्या शेवटच्या वर्षाला. 'युगांत'मधून इरावतीबाईच्या संशोधनानं महाभारतातील व्यक्तिरेखांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला शिकवलं. व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी'त वास्तववादाच्या अंगानं लिहिलेली समूहचित्रं काळजात रुतली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून, मरुभूमीत नंदनवन फुलवणाऱ्या अनुताई वाघांच्या 'कोसबाडचे दिवस'नं भारून टाकलं. अनुताईंच्या कार्यकर्तृत्वाचा प्रभाव आजही माझ्यावर आहे. आदिवासींना शिक्षण मिळावं म्हणून त्यांनी आणि ताराबाई मोडकांनी केलेल्या अथक प्रयत्नांना यश येऊन आज आदिवासी शिक्षित होऊ लागला आहे. खरोखर नतमस्तक व्हावं अशी ही व्यक्तिमत्त्वं. ही पुस्तकं वाचताना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीनं पाहण्याची दिशा मिळाली. अंतर्मुख होऊन विचार करताना असं वाटतं की या पुस्तकांबरोबरच आपण वाढलो. या पुस्तकांनी संस्कार दिले. ते जीवनमूल्यांचे तसंच भाषिक संस्कारही दिले. माझ्या वाचनवेडानं पुढील जीवनातही मी उत्तमोत्तम पुस्तकांचा संग्रह केला. अजूनही त्यात भर पडतेच आहे.

आजही बाजारपेठेत अनेक पुस्तकं येत आहेत. वाचक पुस्तकं वाचताहेत. वाचकाला त्यातून नेमकं मूल्यभान मिळतं आहे का? पुस्तकं वाचताहेत म्हणण्यापेक्षा किती पुस्तकं वाचली जात आहेत? आजच्या वाचकाची गरज काय आहे? याचं गणित मांडायला हवं. आजचं जीवनत गतिमान आहे. इतकं की माणसाला थांबायला वेळ नाही. तो धावतोय, स्पर्धा आहे पैसा मिळवण्यासाठी. या साऱ्यात तो स्वास्थ्य गमावून बसला आहे. दोन जगं इतकी जवळ आली आहेत की वैश्विकीकरणामुळे जीवननिष्ठा बदलली आहे. अभिरुची बदलली आहे. आपल्या भाषेबद्दल आत्मीयता राहिलेली नाही. हळूहळू ती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे असं म्हटलं तर वावगं होणार नाही. कारण आज आपल्या मातृभाषेची स्थिती दयनीय आहे. ही गंभीर बाब आहे. आज घरातल्या प्रत्येक पालकानं, शिक्षकानं, विचारवंतांनी मराठी भाषेवर आपल्या मातृभाषेवर प्रेम करण्यासाठी, मातृभाषेचा-मराठीचा आदर बाळगण्यासाठी प्रयत्नशील व्हायला हवंय. भाषा जगली तरच त्यात उत्तम कलाकृती निर्माण होतील. ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. माध्यमांच्या कक्षा रुंदावल्या आहेत. या सर्व प्रतिकूल परिस्थितीत मराठीतील भाषेतून उत्तमोत्तम ग्रंथ निर्माण करण्याची जबाबदारी प्रकाशकांची आहे. इतके उत्तमोत्तम ग्रंथ निर्माण व्हायला हवेत की आपल्या भाषेतल्या दर्जेदार पुस्तकांकडे मराठी माणसाचं लक्ष वेधलं पाहिजे. मागणी तसा पुरवठा या तत्त्वाकडे

दुर्लक्ष करून, प्रकाशकांनी उत्तम ग्रंथ प्रकाशित करून वाचकांना आकृष्ट करायला हवं. वाचन संस्कृतीची चळवळ त्यासाठी मोठ्या प्रमाणात उभी करायला हवी.

आजचा मराठीतला ग्रंथव्यवहार पाहिला तर कोणीही नवशा गवशा पैसे खर्च करून हौसेखातर आपलं पुस्तक छापून आणतो. प्रकाशकही पैसे घेऊन अशी पुस्तकं प्रकाशित करताना दिसतात. या गोष्टींना आळा बसायला हवा. यामुळे एकूणच पुस्तकांचा दर्जा घसरतो. जी पुस्तकं दर्जेदार, उत्तम आहेत त्यांच्या किमती सर्वसामान्यांना न परवडणाऱ्या. कागद, छपाई या साऱ्यांचे भाव वाढले आहेत त्याला प्रकाशक तरी काय करणार? तेव्हा प्रकाशकांनी एकत्र येऊन अशी एखादी संस्था स्थापन करावी की ना नफा ना तोटा या तत्त्वावर काही दुर्मिळ चांगली पुस्तकं पुनर्मुद्रित करून वाचकांपर्यंत पोचतील. आपल्या भाषेबद्दल अस्मिता असलेल्या संस्थांनी त्यात लक्ष घालावं. अखिल भारतीय साहित्यसंमेलनाच्या निमित्ताने जो निधी जमा होतो त्यातील काही निधी बाजूला ठेवून त्याचा विनियोग अशा चांगल्या कामासाठी करावा. साहित्य संस्कृती मंडळ काही पुस्तकांना अनुदान देतं. नवोदितांच्या पुस्तकांना छपाई करण्यासाठी हे अनुदान असतं. पण साहित्य संस्कृती मंडळानं दर्जेदार पुस्तकांच्या छपाईसाठी प्रकाशन संस्थांना दरवर्षी अनुदान द्यावं. सध्या वाचकांची अभिरुची बदलत आहे, ती का बदलते आहे याचा कुठेतरी शोध घेऊन उत्तमोत्तम ग्रंथांकडे हा वाचकवर्ग कसा वळेल ही जबाबदारी या क्षेत्रातील प्रकाशक व लेखक या दोन घटकांवर आहे. आमच्या बालपणी, विद्यार्थिदशेत, महाविद्यालयीन दिवसांत आणि नंतरही आम्ही उत्तमोत्तम ग्रंथांच्या सहवासानं भारलेलो होतो. आजच्या पिढीतील वाचकांना ते भारलेपण कसं येईल?

---

**– मंदा खांडगे**
२४, ऋणानुबंध सोसायटी,
डी. पी. रोड, औंध
पुणे – ४११००७

# ग्रंथांनी केले बोलते

## बाबाराव मुसळे

मला असे आठवते की पहिल्या वर्गात नाव दाखल केल्यावर माझी एकूण हुशारी बघून गुरुजींनी मला वरच्या वर्गात 'चढविले' न अडखळता, स्पष्टपणे मी जोडशब्दसुद्धा वाचत असे. चौथ्या वर्गापर्यंत, शाळा उघडताच पुस्तके हाती पडली की मराठीसह सर्व पुस्तके वाचून काढीत असे. अवांतर वाचन असे काही नव्हते. कधीमधी एखादा पाहुणा घरी आला तर तो वर्तमानपत्र आणायचा. तो गेल्यावर ते वर्तमानपत्र मी अधाशासारखे वाचायचो. घडी करून जपून दप्तरात ठेवायचो. बुधवारी अनसिंगचा आठवडाबाजार असे. बाबा बाजारातून यायचे. माय रात्री बाबांनी आणलेल्या बाजाराच्या पुड्या सोडायची. चूल पेटविण्यासाठी पुड्यांचे कागद जपून ठेवायची. हे लक्षात आल्यावर ते कागद हस्तगत करून मी वाचून काढायचो. त्यातला एक कागद माझ्या विशेष आवडीचा असे. तो म्हणजे गूळ बांधून आणलेला. त्या कागदांमधून 'तो' गुळाचा कागद शोधून मी त्याला चिकटलेले गुळाचे कण चाटून खायचो. तो कागद नंतर वाचायला मिळावा म्हणून चाटताना फाटणार नाही याची काळजीही घ्यायचो याखेरीज वाचायला विशेष असे काही हाती लागत नव्हते.

चौथा वर्ग गावातल्याच ब्रह्मा शाळेत उत्तीर्ण झाल्यावर गावापासून सहा किलोमीटर दूर असणाऱ्या अनसिंग येथील प.दि.जैन विद्यालयात पाचवीत प्रवेश घेतला. मोठे बंधू साहेबराव त्यावेळी त्याच शाळेत माझ्यापेक्षा तीन वर्गांनी पुढे होते. ब्रह्मा ते पिंपळगाव हे दोन किलोमीटर अंतर पायी, पुढे पिंपळगाव ते अनसिंग हे अंतर खाजगी बसने. (त्यावेळी एस्.टी.बस चालू झालेली नव्हती. दोन-तीन वर्षांनंतर सुरू झाली.) गावची शाळा, गाव सुटले. अनसिंग मोठे गाव. हॉटेले, पानटपऱ्या, दुकाने, दवाखाने, पोलिस स्टेशन असणारे... बसच्या आणि दुकानं-हॉटेले-पानटपऱ्यांवरच्या पाट्या वाचण्याचा छंद लागला. वाचनाची कक्षा वाढल्याचा आनंद झाला. शाळेत व्हरांड्यात दररोजची वर्तमानपत्रे स्टँडवर लावली जात. छोट्या-मोठ्या सुटीत ती वाचायचो. आणखी एक विशेष गोष्ट घडली. दर शनिवारी शाळेतून वाचनालयाचे एक पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याला दिले जायचे. मी माझे पुस्तक तर वाचायचोच, पण मित्रांना मिळालेली पुस्तकेही वाचत होतो. अर्थात ही पुस्तके फार छोटी असायची. वर्ग वाढत गेला तशी वाचनालयांच्या पुस्तकांची पृष्ठसंख्याही वाढत गेली. मराठीच्या पाठ्यपुस्तकांत त्यावेळी कवि-लेखकांचे सचित्र परिचय असायचे. त्यापैकी कोणाचे पुस्तक हाती आले की खूप आनंद व्हायचा. रामायण, महाभारत, शिवाजी, संभाजी, पेशवे यांचा परिचय होत आला होता. मराठी शिकवणाऱ्यांत मुळावकरसरांचे शिकवणे विशेष प्रभावी असायचे. बुधवारी सकाळी होणाऱ्या बालसभेत किंवा इतर वेळच्या जयंती, पुण्यतिथी अशा विशेष कार्यक्रमांत ते खूप छान बोलायचे. कधी कविता म्हणायचे तेव्हा खूप बरे वाटायचे.

याच काळात आणखी विशेष बाब घडली. ती अशी की बाबुराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा वाचनाचे वेड लागले. त्या कुठून कुठून मिळवायच्या. त्यांचे सगळे नायक आणि त्यांच्या माला विशेष आवडत. हिंदीमधले के.रंजीत, ओमप्रकाश वर्मासारखे रहस्यकथालेखकही खूप भावत. खरा कब्जा घेतला गुलशन नंदा आणि राणू (बहुतेक हे नाव चुकत नसावे) या हिंदीच्या

दोन उपन्यासकारांनी. गुलशन नंदांच्या कादंबऱ्यांवरील सिनेमेही पुढच्या काळात न चुकता पाहिले. माध्यमिक स्तरावरच्या टप्प्यावर खूप वाचून वाढले; पण त्याला निश्चित अशी दिशा नव्हती.

मार्च १९६७ साली मॅट्रिक झालो. पुढच्या शिक्षणासाठी परभणीच्या शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतला. कारण मोठे बंधू त्या परिसरात जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षक म्हणून रुजू झाले होते. मॅट्रिकपर्यंतचा वर्गातला एक हुशार विद्यार्थी म्हणून पुढे डॉक्टर होण्याचा किडा डोक्यात होता. त्यामुळे विज्ञानशाखेत प्रवेश घेतला. साहित्य विषयाशी फारकत झाल्याने मराठी वाङ्मयात (खरे तर हा शब्द पुढे कितीतरी वर्षे मला नीट वाचता, लिहिता येत नव्हता) कोणाचे काय वाचले पाहिजे हे कळायला मार्ग नव्हता. तरी फडके, खांडेकर, अत्रे, साने गुरुजी अशी नावे ओळखीची झाली होती. लायब्ररीत जाऊन पुस्तक वाचायला घेण्यापेक्षा चाळणे, हाताळणे याचाच छंद लागला. तेथेच मराठीचे प्राध्यापक असणारे प्राचार्य रा.रं.बोराडे, डॉ. प्रभाकर मांडे यांच्याशी भीत भीत संपर्क आला. डॉ. मांडे सरांच्या घरापर्यंत पोचता आले. त्यांच्या बोलण्यातून दलित साहित्याची, अनियतकालिकांची त्या काळी विशेषत्वाने सुरू असलेली चळवळ कळली. अनेक नव्या लेखक-कवींची नावे समजली. 'अस्मितादर्श', 'अबकडई' यांसारखे अंक हाताळायला मिळाले. 'काय वाचावे'? हे थोडेफार लक्षात आले.

मला लेखक-कवी म्हणून घडवायला कारणीभूत ठरलेली त्याकाळची खास गोष्ट म्हणजे ज्येष्ठ बंधूंचे चुडावा (रेल्वे स्टेशन) येथील शाळेत असणे. त्या शाळेची (तेथे एच. एससी.पर्यंत शाळा) लायब्ररी अतिशय समृद्ध. त्या लायब्ररीतल्या दीड-दोन हजार लहान-मोठ्या ग्रंथांचा मी फडशा पाडला. फडके, खांडेकर, अत्रे, सानेगुरूजी, ना.सं. इनामदार, वि.वा. हडप, वि.वि. बोकील, रणजित देसाई, शिवाजी सावंत, उद्धव शेळके, आनंद यादव, रा.रं. बोराडे, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, श्री.ना. पेंडसे, जयवंत दळवी, पु.ल. इत्यादी नामवंतांचा परिचय तेथेच झाला. मला आठवते, 'मृत्युंजय'मधल्या द्रौपदी-वस्त्रहरणावर मी एक दीर्घ कविता केली होती. ही पुस्तके मला वाचायला मिळाली नसती तर मला नाही वाटत मी लेखक-कवी झालो असतो.

मी १९६९-७०च्या दरम्यान कथा-कविता लिहायला सुरुवात केली. सुरुवातीच्या कथा किस्सेवजा होत्या. त्याचे कारण तशाच स्वरूपाच्या काही नामवंतांच्या कथा, मासिके, अनियतकालिकांतून, पुस्तकांतून वाचायला मिळत. पारेश्वर विद्यालय, पार्डी टकमोर (ता.जि.वाशिम) येथे १९७३ मध्ये विज्ञान-शिक्षक म्हणून नोकरीला लागलो. या काळात चांद्यापासून बांद्यापर्यंत अनेक ठिकाणच्या मासिके/ अनियतकालिकांशी संपर्क आला. कुठे कविता, कुठे कथा छापून येऊ लागल्या. अगदी 'सत्यकथे'लाही खेटायचा प्रयत्न केला. पण जमले नाही. पुढे 'सत्यकथा' बंद पडली तेव्हा त्याचे काही वाटले नाही. ('सत्यकथे'ने मला स्वीकारले असते तर मात्र....!) 'सत्यकथे'तून लिहिणारे काही कविमित्र ढसाढसा रडले हे कळले तेव्हा नवल वाटले. नाशिकाहून निघणारे 'सा. आपण' (ज्याने माझी पहिली आणि नंतरच्या अनेक कथा प्रकाशित केल्या) बंद पडल्यावर मलाही तोच अनुभव आला. अनियकालिकांची चळवळ, दलित साहित्य चळवळ, ग्रामीण साहित्य चळवळीने मी पुरता झपाटलो. बाबुराव बागूल, शंकरराव खरात, केशव मेश्राम, दया पवार, नामदेव ढसाळ हे दलित आणि डॉ. यादव, बोराडे, मनोहर तल्हार, भास्कर चंदनशिव, गुंदेकर, द.ता. भोसले, वासुदेव मुलाटे अशी ग्रामीणवाली मंडळी 'सगेसोयरे' बनली. अस्मितादर्श, अक्षरवैदर्भी, अनुष्टुभ् ही नियतकालिके माझी श्रद्धास्थाने बनली. ग्रामीण साहित्य चळवळीने सुरू केलेली साहित्यसंमेलने, चर्चासत्रे, मेळावे, कार्यशाळा यांना न चुकता हजेरी लावू लागलो. त्यात भर पडली जनसाहित्य चळवळीची आणि विदर्भ साहित्य संघाची. या काळात एखादे पुस्तक चर्चेत आले की ते मिळवायचे, वाचायचे. ते जमलेच नाही तर त्यावरची परीक्षणे, समीक्षा तरी वाचायचीच. यातून काही पुस्तकांची अनाहूतपणे मी ही परीक्षणे लिहू लागलो. ती छापूनही येऊ लागली. पुढे काही लेखक-मंडळी परीक्षणार्थ आपापली पुस्तके माझ्याकडे पाठवू लागली.

आज वयाची साठी ओलांडताना एक गोष्ट पथ्य म्हणून आवर्जून पाळतो. गाजलेली, गाजणारी पुस्तके वाचली तरी नव्याने लिहिणारी जी मंडळी आहेत, त्यांनी पाठविलेली वा प्रत्यक्ष भेटीत दिलेली कथा, कादंबरी, काव्य वा इतर विषयांवरची पुस्तके न कंटाळता वाचतो. कुणी परीक्षण लिहा म्हटले तर परीक्षण लिहितो, कोणी अभिप्राय द्या म्हटले तर अभिप्राय देतो. कोणाला प्रस्तावना हवी असल्यास तीही देतो. (पण हे सारे तब्येत सांभाळून. कारण गेली बावीस वर्षे मधुमेहाशी मैत्री आहे.) याचे कारण ही मंडळी अपेक्षेने माझ्याकडे येतात तेव्हा त्यांच्या ठिकाणी मी मला पाहतो. लिहिण्यासाठी मी किती मान-अपमान-अवहेलना-कष्ट सहन केले. मी निवडुंगासारखा वाढलो. डॉ. मांडे, प्राचार्य बोराडे, डॉ. आनंद यादव ही नावे वगळली तर मला आकार देणारे (अंतराच्या दृष्टीने) जवळचे कोणी नव्हते. त्यावेळी फोन करायचा म्हणजे आधी बुकिंग करावे लागे. तरीही संपर्क होईलच याचा भरवसा नसे. पत्र हेच संपर्कमाध्यम. आज मोबाईल, ई-मेल अशी अत्याधुनिक साधने आली. तरी माझ्याकडे येणारी नवीन लिहिणारी पोरे धास्तावलेलीच वाटतात. मी म्हणजे कोणी फार मोठा, किंवा माझा शब्द परवलीचा, की ज्यामुळे माझ्या संपर्कात येणाऱ्याचे सोनेच होईल अशी माझी अजिबात धारणा नाही. लेखनामागच्या धडपडीचा गेल्या चाळीस वर्षांचा मी जो बरावाईट अनुभव घेतला तसा अनुभव कोणाला येऊ नये, म्हणून अशा मंडळींची हस्तलिखिते वा त्यांची पहिली

पहिली पुस्तके मला फार मोलाची वाटतात. त्यामुळे एखादे गाजत असलेले पुस्तक वाचले न वाचले तरी त्या पुस्तकावर त्याचा काही प्रभाव पडणार नाही; पण एखाद्या नवोदिताची मी उपेक्षा केली तर.... 'आणिकांच्या घातें । ज्यांची निवतील चित्ते।।' या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे मी पापी ठरणार नाही काय?

मेहता (पुणे), साकेत, कीर्ती, जनशक्ती (औरंगाबाद), बजाज (अमरावती), प्रतिभास (परभणी) हे माझे प्रकाशक. या सर्वांची माझ्याशी सन्मानाची वागणूक. अलिकडे काही प्रकाशकांनी वेगवेगळे प्रकार सुरू केल्याचे कळते. नवोदित त्याला बळीही पडतात. त्यातून सकस फार कमी प्रमाणात छापून येते. कथा-कविता-कादंबरीचे सुमार दर्जाचे एखादे पुस्तक प्रकाशित झाले की ही मंडळी स्वत:ला फार मोठी समजतात. सकस, दर्जेदार लेखनासाठी आवश्यक असणारा संयम, अभ्यासूवृत्ती अलीकडे लोप पावते आहे. त्यामुळे पाण्यावर फेस तरंगावा तसे पुस्तकांचे पीक दिसते. त्यातून काळाच्या ओघात किती टिकेल, हा प्रश्नच आहे. भाराभर पुस्तके लेखक-कवींनी- प्रकाशकांनी काढण्यापेक्षा नेमकीच, टिकाऊ काढावीत. आपल्या प्रतिभेला, व्यवसायाला गुणवत्तेची जोड लावावी. त्यामुळे वाङ्मयाचा दर्जा टिकेल, वाढीला लागेल. शासकीय, खाजगी स्वरूपाची बक्षिसे मिळणारी पुस्तके उच्च दर्जाची असतातच असे मानण्याचे कारण नाही. त्यामुळे लिहिणाऱ्यांनी पुरस्कारासाठी काही लिहू नये. बहुश्रुत वाचकांचे अभिप्राय कोणत्याही पुरस्कारांपेक्षा कमी लेखण्याचे विचार मनातही आणू नये. नाहीतरी तुकारामांनी म्हटलेच आहे, 'पिकवावे धन। ज्याची आस करी जन।।'

**बाबाराव मुसळे**
१४३, एल्.आय.जी. सेक्टर-२,
आय.यु.डी.पी. कॉलनी,
वाशिम - ४४४५०५
भ्रमणध्वनी - ९३२५० ४४२१०.

# जनसंवाद : प्रथम वर्धापनदिन

कुठेही आणि कधीही, ज्यांना सत्ताकांक्षी म्हणता येईल असे धनवान आणि राजकारणीच राज्यशकट चालवत असतात. मात्र, राज्यकारभारात परिणामकारकता येते ती अशा सत्ताकांक्षींवर सत्शक्तीचा अंकुश राहतो, तेव्हा. स्वातंत्र्योत्तर भारतात दोन गोष्टी घडल्याचे जाणवते, सत्ताकांक्षींवर निर्माण झालेला गुन्हेगारी क्षेत्राचा (अंडरवर्ल्ड) प्रभाव आणि सत्शक्तीच्या अंकुशाची झालेली दुरवस्था.

त्या दुरवस्थेला दोन कारणे आहेत. त्यांतील पहिले आहे ते हळुहळू, पण पद्धतशीरपणे झालेले सत्शक्तीचे खच्चीकरण. पहिल्यापेक्षा कदाचित जास्त महत्त्वाचे, दुसरे कारण म्हणजे सत्शक्तीचे विभाजन; विचार, धर्म, जात, भाषा अशा व इतर अनेक कारणांमुळे होणाऱ्या विभाजनामुळे अंकुश ठेवण्यात सत्शक्तीला येणारा कमकुवतपणा!

विरुद्ध विचारसरणीच्या व्यक्तींपासून फारकत घेतली, अंतर ठेवले तर विचारांच्या शुद्धतेत वृद्धी होते, एक प्रखरता येते हे मान्य, पण क्षमताहीन शुद्धता कामाची नसते. याउलट, विरोधी मतप्रवाहाबरोबर सुद्धा 'ऊठबस' साधल्याने स्वत:ची वेगळी प्रतिमा जपूनही गरजेच्या किमान परिघात एकवाक्यता साधता येऊ शकते. अशी प्रभावी सत्शक्ती जनतेच्या भल्याची धोरणे राबवून घेण्यासाठी शासनावर अंकुश ठेवू शकते; ते सोपे नाही पण स्वातंत्र्यलढ्यात देशाने ते अनुभवले आहे.

सुयोग्य शासन देशाच्या विकासाला जबाबदार ठरते. देशाचा विकास तीन प्रकारे होण्याचे अभिप्रेत असते; भौतिक, नैसर्गिक संसाधनांचा आणि मानवी संसाधनाचा विकास. स्वतंत्र झाल्यावर प्रजासत्ताक पण अविकसित मानला गेलेला भारत आज विकासाभिमुख ठरतो, अपेक्षा वाढवतो कारण अशाने साधलेली भौतिक आणि नैसर्गिक संसाधनांच्या उपयोगातील प्रगती. परंतु, ज्या विकासाला आंतराष्ट्रीय जगतात खरे महत्त्व दिले जाते ती बाब आहे मानवविकासाची.

मानवविकासाची विचार केला तर आज, स्वातंत्र्योत्तर सहा दशकांनंतरही, भारताला अविकसितच मानावे लागेल; नमुन्यादाखल पुढे दिलेल्या लक्षणांवरून तरी तसे मानण्यास कोणाची हरकत नसावी.

- दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या भारतीयांची आजची संख्या स्वातंत्र्य-प्राप्तीच्या वेळी असलेल्या संपूर्ण लोकसंख्ये-पेक्षा जास्त आहे.
- भारतातील अक्षरओळख नसलेल्या जनतेची टक्केवारी जरी हळुहळू कमी होत असली तरी वाढणारी एकूण संख्या भयावह आहे.
- वयाच्या सहाव्या वर्षानंतर बालकांचे प्राथमिक शिक्षण जरी भारतात विनामूल्य आणि अनिवार्य झाले असले तरी कोट्यवधी भारतीय मुला-मुलींना प्राथमिक शाळेचे दर्शनही घडलेले नाही.
- उपलब्ध शासकीय प्राथमिक शिक्षणाची परिस्थिती बहुसंख्य ठिकाणी असमाधानकारक आहे. 'प्रथम' ह्या संस्थेने दोन वर्षांपूर्वी केलेल्या देशभराच्या सर्वेक्षणातून नजरेस आलेली प्राथमिक शिक्षणाची दुरावस्था लाजीरवाणी आहे. त्या सर्वेक्षणात असे आढळून आले होते की ठिकठिकाणी सातवी पास झालेल्या अनेक मुला-मुलींच्या ज्ञानाचा आवाका पहिलीची परीक्षा देण्यासुद्धा असमर्थ होता.
- अनेक कायदे असूनही बालमजुरीचे उच्चाटान झालेले नाही; शहरातील शहरांत, खेड्यांत आणि घराघरांत

सर्रास बालमजुरी अस्तित्वात आहे.

● दोन हजार दहाच्या एक एप्रिलला पंतप्रधानांना आपल्या भाषणात सांगावे लागते, ''ह्या देशातील प्रत्येक मुला-मुलीने भावी आयुष्याचं स्वप्न बघावं आणि ते स्वप्न जगावं, असं मला वाटतं.'' देशाच्या पंतप्रधानाला तसे 'वाटावे' हेच ती स्वाभाविक गोष्ट सामान्य मुला-मुलींना आज अशक्य आहे, ह्या गोष्टीचा अप्रत्यक्ष कबुलीजबाब मानला पाहिजे.

अशा अविकसित प्रजेवर 'निवडणुकां'च्या माध्यमातून 'राज्य' करणे व त्या 'सत्ते'चा निरंकुश उपभोग घेणे, हेच ध्येय ठरल्यामुळे शासनाने मानवविकासासाठी कितीही प्रयत्न करत असल्याचे भासवले - मग शासन कोणत्याही पक्षाचे असो - तरी देश खऱ्या अर्थाने अविकसितच राहणार, संदर्भातील देशातील परिस्थितीत काहीही फरक पडणार नाही.

सामाजिक बदल, परिवर्तन ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. स्त्री हक्क, अस्पृश्यता निवारण आणि कामगार हित ह्या चळवळींची बिजे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पेरणी गेली. शे-सव्वाशे वर्षांनंतर त्या सामाजिक चळवळींना लाभलेले यश-थोडे का फार, हे बघणाऱ्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून राहील - आपण आज अनुभवतो आहोत.

मानवविकासासाठी सत्शक्तीचा राज्यशकट चालवणाऱ्या जथ्यावर अंकुश असणे गरजेचे आहे आणि सत्शक्ती प्रभावी ठरण्यासाठी तिचे संघटन होणे अधिक आवश्यक आहे. त्याच उद्देशाने महाराष्ट्रातील विविध विचारसरणींची आणि मतप्रवाहांची काही मंडळी चर्चेसाठी एकत्र जमली आणि दोन हजार नऊच्या मे महिन्यात झालेल्या त्या परिसंवादातून 'जनसंवाद' हा गट उदयास आला; वर्षभर टिकून राहिला, हे विशेष!

'जनसंवाद' ह्या अर्भकाला 'इनक्युबेटर'मध्ये काही काळ जोपासून त्या गटाच्या विचारांचे एखाद्या देशव्यापी चळवळीत रूपांतर होईल ह्याच आशेने हा गट सुरुवतीची पाच-दहा वर्षे कार्यरत राहील; स्वतःच्या आयुष्यात फळाची अपेक्षा सोडाच, ते मिळण्याचा विचार देखील दूर ठेवून सातत्याने प्रचाराचे काम करत राहणे, हेच 'जनसंवाद'चे ध्येय असेल.

एका पणतीने दहा पणत्यांतील वाती फुलवाव्यात आणि त्या फुललेल्या वातींनी पुढील शंभर ज्योतींना अशा 'ज्योतसे ज्योत जलाते चलो' ह्या पद्धतीने 'जनसंवाद' देशात प्रस्तुत विचारांची रुजवात करेल; नकळत कधीतरी 'चळवळ' जोम धरेल ही खात्री मात्र मनात पक्की आहे.

व्यवस्थापनशास्त्रात 'काळाचा महिमा' (टाइम थिअरी) हा नेतृत्वकलेचा एक तात्त्विक प्रकार मानला जातो; वेळ व परिस्थितीनुसार पु.ल. देशपांडे व जयप्रकाश नारायण हे त्याच तत्त्वाचे उदाहरण मानता येईल. इतिहासातील सामाजिक नेतृत्वाचा विचार करता स्त्री हक्क चळवळीसाठी फुले दाम्पत्य-कर्वे, अस्पृश्यता निवारणार्थ शाहू-आंबेडकर व कामगार संघटनांसाठी लोखंडे-डिमेलो ही नावे सहज स्मरतात, स्वातंत्र्य चळवळीत तर बेझंट-नवरोजी-टिळक-गांधी-सावरकर-आझाद अशी नावांची मालिकाच समोर येते.

एक वर्षाचा हा गट भविष्यात अशा एखाद्या समर्पक नेतृत्वाच्या साहाय्याने उभे राहायला शिकेल, चालेल आणि धावेलसुद्धा, ह्याच भावनेने जनसंवादची वाटचाल असेल. मात्र, लावलेली ही ज्योत त्या वाटेवर विझणार नाही, ह्याची काळजी आम्ही घ्यायला हवी.

या! पुढे या!!

'आपण नाही तर कोण आणि आता नाही तर केव्हा' ही घोषणा देणाऱ्या आमच्या आवाजात तुमचाही आवाज मिसळू द्या!

**- सु.गो. तपस्वी**

भ्रमणध्वनी - ९७६६१ ४२२४३

suhas@fondsindia.com




## कऱ्हाड : प्रीतिसंगमावरचं आदितीर्थ
### विजय माळी

कृष्णा-कोयनेच्या संगमावर वसलेल्या कऱ्हाड शहराला प्राचीन-काळापासून 'दक्षिण काशी' म्हणून ओळखतात. इ.स.पूर्व २५० पासून असलेली लेणी, बावीसशेहून अधिक वर्षांचा इतिहास असलेल्या या शहराने अनेक राजवटी पाहिल्या. निसर्गसौंदर्याबरोबरच संपन्न असा सांस्कृतिक-राजकीय वारसा या शहराला लाभला. आधुनिक महाराष्ट्र घडवताना त्याला सुसंस्कृत ठेवणारे, महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे हे गाव महाराष्ट्राच्या नि देशाच्या राजकीय पटलावर नेहमी महत्त्वपूर्ण राहिले. त्या कऱ्हाडचे हे समग्रदर्शन.

**मूल्य १०० रु. सवलतीत ५० रु.**